RNI NO. MAHMAR/2020/84035

Sachin Sir's English Speaking
Its 100% guaranteed course
सबसे आसान तरीकेसे
अंग्रेजी बोलना
सिखानेके लियेही
हम जाने जाते है।
9028851719

BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

उपलब्ध आहे!
मिस्त्री, टाइल्स फिटर, पेंटर, कारपेंटर,
प्लंबर इत्यादीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.
संपर्क
मो. 8482839451



शनिवार ११ ऑक्टोबर २०२५ | वर्ष : ५ | अंक : २०२ | दैनिक | किंमत : ₹५/-

Saturday, 11 October 2025 | Year : 5 | Issue : 202 | Daily | Rate: Rs. 5/-



## नागपुरात आरक्षण बचावसाठी ओबीसींचा एल्गार





### ओबीसींच्या मोर्चात तुफान गर्दी,

### संविधान चौकात वाहतूक ठप्प!

**नागपूर :** 2 सप्टेंबर रोजी राज्य सरकारने काढलेल्या जीआरनंतर ओबीसी समाजात अस्वस्थता निर्माण झाली आहे. त्यातून आत्महत्यांचे सत्र निर्माण झाले आहे. या आत्महत्या थांबविण्यासाठी सरकारने हा काळा जीआर या रद्द करावा, या मागणीसाठी शुक्रवारी नागपुरात ओबीसींचा आरक्षण बचाव मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात विदर्भासह राज्यभरातून हजारो ओबीसी बांधव सहभागी झाले होते. ओबीसींच्या हक्काला धक्का लावाल तर परिणाम वाईट होतील, असा इशारा या मोर्चाद्वारे देण्यात आला.

मराठा आरक्षणाच्या संदर्भात 2 सप्टेंबरला राज्य शासनाने काढलेल्या शासन निर्णयानुसार हैदराबाद संस्थानातील गॅझेटमध्ये 'कुणबी' अशी नोंद असलेल्या मराठा व्यक्तींना कुणबी प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. हीच बाब पारंपरिक ओबीसी समाजाच्या असंतोषाचे कारण ठरली आहे. ओबीसी नेत्यांचा ठाम आरोप आहे की, मराठा समाज सामाजिकदृष्ट्या मागास नाही आणि त्यांना कुणबी प्रमाणपत्र देऊन ओबीसी प्रवर्गात सामावणे म्हणजे ओबीसींच्या आरक्षणावर अतिक्रमण आहे. या विरोधात कॉंग्रेसचे विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांच्या पुढाकाराने नागपूरमध्ये सकल ओबीसी महामोर्चाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

मनोज जरांगे यांच्या मुंबई येथील आंदोलनानंतर राज्य सरकारने मराठा समाजाला ओबीसी प्रमाणपत्र देण्यासाठी काढलेल्या दोन सप्टेंबरच्या शासन निर्णयाचा विरोध करण्यासाठी विदर्भासह राज्यभरातून हजारो ओबीसी बांधव नागपूरच्या रस्त्यावर उतरले आहेत. एक हजाराहून अधिक बसेस, पाच हजाराहून अधिक चार चाकी वाहनाने आंदोलनकर्ते नागपुरात दाखल झालेले आहेत.

यशवंत स्टेडियममधून या मोर्चाला सुरुवात झाली असून संविधान चौकामध्ये मोर्चाचा समारोप होणार आहे. यशवंत स्टेडियममधून मोर्चा निघाला असून प्रत्येक जण हातात पिवळा झेंडा, डोक्यावर पिवळी टोपी आणि गळ्यात पिवळ्या रंगाचा दुपट्टा टाकून सहभागी झाला आहे. त्यामुळे नागपूरचे रस्ते ओबीसीमय झाल्याचे दिसून येत आहे.

"एकदा जरांगेंनी जाऊन पाहावे, आमच्या गरिबाच्या मुलीला पाणी मिळत नाही, इतकी वाईट अवस्था आहे. मराठा समाजाला शासनाने 13,500 कोटी दिले, ओबीसी हा DNA असणाऱ्यांना भाजप सरकारने काय दिले तर 500 कोटी दिले. अजित पवारांनी सारथीची काचेची इमारत बांधली, आम्हाला भाड्याचा घरात इमारत दिली. आपण आपल्या हक्कासाठी 2 सप्टेंबरचा जीआर रद्द व्हावा यावर ठाम राहणार आहोत. हा मोर्चा तर झाँकी आहे अजून पिक्चर बाकी आहे.

- विजय वडेट्टीवार

दम असेल तर फडणवीस, शिंदे, पवार यांनी तेलगणांप्रमाणं 43 टक्के आरक्षण देण्याची धमक दाखवावी, ओबीसी समाज त्यांच्या पाठीशी राहिल. असे थेट आव्हानी यावेळी वडेट्टीवार यांनी दिले. ते पुढे म्हणाले, आम्ही कोणाचा विरोधात नाही, आपल्याला लढावे लागणार आहे. जरांगेच्या दबावात सरकार झुकले आहे, बेअक्कल, अनपढ लोकांनी ओबीसी समाजाचे नुकसान केले, ओबीसीचे नुकसान सरकारने केले आहे. ओबीसींना ओबीसीचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी सहा महिने लागतात. पण यांना हेच प्रमाणपत्र 1 तासांत मिळत आहे. ओबीसी बांधवानो सिद्ध व्हा, आघात करण्याची तयारी ठेवा, हातात पाणी ठेवत, ओठांवर चिंगरी ठेवत लढण्याची तयारी ठेवा अन्यथा तुम्ही बकऱ्यासारखे कापले जाल, जरांगेंनी मुंबई जाम केली! आता OBC पुणे अन् ठाणे जाम करणार ? सकल ओबीसी समाजाचा सरकाराला इशाराअशा शब्दांत विजय वडेट्टीवार यांनी ओबीसींच्या मोर्चामध्य आपली भूमिका स्पष्ट केली

**विदर्भच नव्हे तर कोकणातूनसुद्धा अनेक ओबीसी बांधव यात सहभागी झाले होते. याशिवाय ओबीसी नेते लक्ष्मण हाके, महादेव जानकर, शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते व माजी गृहमंत्री अनिल देशमुख, कॉंग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष माणिकराव ठाकरे, माजी मंत्री सुनील केदार, माजी राज्यमंत्री राजेंद्र मुळक, रामटेकचे खासदार श्यामकुमार बर्वे, भंडाराचे खासदार प्रशांत पडोळे, आमदार बाळासाहेब मांगुळकर, प्रकाश अण्णा शेंडगे, रवींद्र दरेकर, नरेंद्र जिचकार आदीही यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते.**

### सरन्यायाधीश गवई यांचा महत्वाचा निर्णय!

या मोर्चाच्या पूर्वसंध्येला कॉंग्रेस नेते विजय वडेट्टीवार, समन्वय समितीचे सदस्य उमेश कोराम आणि कॉंग्रेस नेते रवींद्र दरेकर यांनी मोर्चाच्या तयारीचा आढावा घेतला. त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, 'आजचा मोर्चा हा एक ट्रेलर आहे, अजून पिक्चर बाकी आहे.' यावरून आगामी काळात आंदोलन अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. सरकारने 2 सप्टेंबर रोजी काढलेला जीआर हा ओबीसी समाजाच्या मुळावर घाव आहे. या निर्णयामुळे ओबीसी समाजाचे हक्क हिरावले जात आहेत. त्यामुळे तो जीआर तात्काळ रद्द झाला पाहिजे.

## देशभरात टप्प्याटप्प्याने SIR लागू केले जाईल...

**नवी दिल्ली :** निवडणूक आयोग देशात मतदार यादीच्या सघन पुनरीक्षण (SIR) ची प्रक्रिया टप्प्याटप्प्याने सुरू करू शकते. आयोगाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, पुढील वर्षी ज्या राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत तेथे SIR प्रक्रिया सुरू होऊ शकते. ज्या राज्यांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत किंवा सुरू आहेत तेथे आयोग मतदार यादी पुनरीक्षण मोहीम राबवणार नाही. निवडणूक आयोगाचे म्हणणे आहे की निवडणूक यंत्रणा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये व्यस्त आहे आणि SIR वर लक्ष केंद्रित करू शकणार नाही. 2026 मध्ये आसाम, केरळ, पुद्दुचेरी, तामिळनाडू आणि पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत हे लक्षात घेण्यासारखे आहे. या पाच राज्यांव्यतिरिक्त, पहिल्या टप्प्यात काही इतर राज्यांमध्येही एसआयआरची प्रक्रिया सुरू होऊ शकते. बिहारमध्ये एसआयआरचे काम पूर्ण झाले आहे, जिथे 30 सप्टेंबर रोजी सुमारे 7.42 कोटी नावांची अंतिम यादी प्रकाशित करण्यात आली होती. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी सोमवारी सांगितले की, सर्व राज्यांमध्ये मतदार याद्यांचे सखोल पुनरावलोकन सुरू करण्याचे काम सुरू आहे आणि ते सुरू करण्याचा अंतिम निर्णय निवडणूक आयोग घेईल.



## 30 दिवसांत 26 नक्षलवादी ठार

### 98 जणांनी आत्मसमर्पण केले

**नागपूर :** केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी घोषणा केली आहे की मार्च 2026 पर्यंत देशाच्या सर्व भागातून नक्षलवाद पूर्णपणे संपवला जाईल. सीआरपीएफ, त्यांची विशेष तुकडी, डीआरजी आणि राज्य पोलिस नक्षलवाद्यांचा खात्मा करण्यात आणि त्यांच्याकडून आत्मसमर्पण मिळवण्यात गुंतले आहेत. सप्टेंबरमध्ये सुरक्षा दलांना या मोहिमेत लक्षणीय यश मिळाले. नक्षलग्रस्त भागात 98 माओवाद्यांनी सीआरपीएफ आणि राज्य पोलिसांसमोर आत्मसमर्पण केले. याव्यतिरिक्त, 98 माओवाद्यांना पकडण्यात आले. सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत 26 नक्षलवादी मारले गेले. नक्षलवाद्यांच्या गडांमध्ये प्रगती करत असलेल्या सीआरपीएफ/कोब्राने छत्तीसगडमध्ये 100 एफओबी स्थापन केले आहेत. सप्टेंबर महिन्यात, सीआरपीएफ सक्रिय असलेल्या भागातून 64 शस्त्रे जप्त करण्यात आली. विविध भागातून 55 आयईडी, 2656 राउंड दारूगोळा, 94 ग्रेनेड, दोन बॉम्ब, 1006 डिटोनेटर, 113.85 किलो स्फोटके, 1,77,140 रुपये रोख, 45 जिलेटिन स्टिक्स आणि 4 किलो अंमली पदार्थ जप्त करण्यात आले. नक्षलवाद्यांच्या गडावर पोहोचून, सीआरपीएफ आणि इतर दल 48 तासांच्या आत 'फॉरवर्ड ऑपरेटिंग बेस' स्थापन करत आहेत.

## मुस्लिमांचा विश्वास जिंकणे व दलित मतपेढी एकजूट ठेवणे हे उद्दिष्ट : मायावती

**लखनऊ :** कांशीराम यांच्या स्मृतिदिनानिमित्त लखनऊमध्ये बहुजन समाज पक्षाने (बसपा) आयोजित केलेल्या रॅलीने राज्यात एक नवीन राजकीय खळबळ उडाली. पक्षाच्या सुप्रीमो मायावती यांनी या रॅलीद्वारे मुस्लिमांचा विश्वास जिंकणे आणि दलित मतपेढी एकजूट ठेवणे हे उद्दिष्ट ठेवले. रॅलीत मायावती म्हणाल्या, *'देशातील अल्पसंख्याक, विशेषतः मुस्लिम, विकसित होत नाहीत आणि सुरक्षितही नाहीत. अशा परिस्थितीत, फक्त बसपाच त्यांना योग्य दिशेने मार्गदर्शन करू शकते.'* या विधानाने विरोधी पक्षांच्या, विशेषतः समाजवादी पक्षाच्या (सपा) मुस्लिम मतपेढीत घुसण्याची त्यांची रणनीती स्पष्टपणे मांडली.



लोकसभा निवडणुकीत समाजवादी पक्षाच्या पीडीए (मागासवर्गीय, दलित, अल्पसंख्याक) सूत्रामुळे पराभव पत्करावा लागलेला बसपा आता अल्पसंख्याक मतदारांकडे वळला आहे. मायावतींनी त्यांच्या भाषणात वारंवार यावर भर दिला की 'अल्पसंख्याकांनी खोट्या आश्वासनांपासून आणि द्वेषाच्या राजकारणापासून दूर राहावे. बसपाच त्यांच्या आदर आणि सुरक्षिततेची हमी देते.'

राजधानी लखनऊ येथील कांशीराम स्मारकात तीन लाखांहून अधिक लोकांच्या उपस्थितीवरून असे दिसून आले की 2027 च्या विधानसभा निवडणुकीसाठी बसपने आपला पाया मजबूत करण्यासाठी ठोस पावले उचलली आहेत. मायावतींनी त्यांच्या भाषणात थेट भाजपवर हल्ला करणे टाळले, उलट अप्रत्यक्षपणे समाजवादी पक्षावर (सपा) निशाणा साधला. त्या म्हणाल्या, *'सपाने दलित महापुरुषांना सर्वात जास्त दुर्लक्षित केले आहे. जातीवादी पक्ष संविधान बदलू इच्छितात आणि जुनी व्यवस्था पुन्हा स्थापित करू इच्छितात.'*

पण सर्वात आश्चर्यकारक क्षण तेव्हा आला जेव्हा मायावतींनी अप्रत्यक्षपणे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचे कौतुक केले. त्या म्हणाल्या, 'कायदा आणि सुव्यवस्थेच्या मुद्द्यावर योगी सरकारने काही कठोर पावले उचलली आहेत, जी सकारात्मक आहे.' या विधानामुळे राजकीय वर्तुळात एक नवीन वाद निर्माण झाला आहे.

मायावती म्हणाल्या, 'आकाश आता चळवळीत पूर्णपणे सहभागी आहे आणि कठोर परिश्रम करत आहे. कांशीराम नंतर तुम्ही ज्याप्रमाणे मला पाठिंबा दिला, त्याचप्रमाणे आकाशलाही तेच करावे लागेल.'

या घोषणेवरून हे स्पष्ट होते की बसपा 2027 च्या विधानसभा निवडणुकांचा वापर केवळ राजकीय कारणांसाठीच करत नाही तर पिढीजात नेतृत्व बदलासाठी एक व्यासपीठ म्हणूनही करत आहे.

स्थापना सन १९७४

सप्रेम जयभीम

महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ द्वारा



कास्ट्राईब वर्धापन दिन समारोह

आपणास कळविण्यात आनंद होत आहे की काष्ट्राईब महासंघाची स्थापना 11ऑक्टोबर 1974 रोजी धम्म चक्र प्रवर्तन दिनानिमित्त दीक्षाभूमी येथे माजी सनदी अधीकारी एस. जी. सुरडकर यांनी केली, गत 50 वर्षापासून संघटना सातत्याने सामाजिक बांधिलकी जोपासून कार्य करित आहे.

कास्ट्राईब वर्धापन दिनानिमित्त सत्कार व कवी संमेलन आयोजित आहे, आपण उपस्थित राहून सहकार्य करावे .

कार्यक्रम शनिवार दि 11/10/2025 रोजी. दुपारी 12.30 वाजता

स्थळ - दै बहुजन सौरभ कार्यालय, अजनी पोलीस स्टेशन रोड नागपूर

कार्यक्रमाचे अध्यक्ष
मा अरुण गाडे, अध्यक्ष कास्ट्राईब
उदघाटक
मा. हरीश उईके,
अध्यक्ष, गोंडवाना गणतंत्र पक्ष
विशेष अतिथी
मा अनिरुद्ध शेवाळे
राष्ट्रीय आंबेडकरी प्रबोधनकार
मा जनार्दन मुन आंबेडकरी विचारवंत
मा सुग्रीवप्रसाद साहनी, निषाद पार्टी
प्रमुख अतिथी
मा. प्रा जावेद पाशा
अध्यक्ष-राष्ट्रीय ओबीसी मुस्लिम परिषद
मा प्रा. रमेश पिसे
राष्ट्रीय ओबीसी मोर्चा
मा प्रा. मधुकर उईके
केंद्रीय अध्यक्ष, ऑल इंडिया आदिवासी एम्प्लॉईज फेडेरेशन
मा प्रा राहुल मुन,
संविधान परिवार
मा. संध्याताई राजूरकर,
निवासी संपादक, बहुजन सौरभ
मा. मीनाताई भागवतकर
राष्ट्रीय चर्मकार महासंघ
मा प्रताप पटले, संभाजी ब्रिग्रेड
मा किशोर बिरला,
डॉ बाबासाहेब आंबेडकर सोशल जस्टीस संघटना.

सत्कार समारंभ
डॉ बाबासाहेब आंबेडकर सामाजिक पुरस्कार
मा शालिक जिल्हेकर, प्रसिद्ध नाटककार, जेष्ठ कवी
मा हृदय चक्रधर, साहित्यीक, गझलकार, जेष्ठ कवी
** कवी संमेलन **
गोविंद वाघमारे, कवी सम्मेलन अध्यक्ष
अतिथी कवी:
प्रा हृदय चक्रधर, प्रा अजय चिकाटे, प्रा नाना शेंडे, शालिक जिल्हेकर, खेमराज भोयर
संचालन: प्रभु फुलझेले/ लीलाधर गायकवाड
: मान्यवर कवी :
सुभाष मानवटकर, प्रा डॉ मनिष वानखेडे, चित्तरंजन चौरे, नागोराव सोनकुसरे, दिगंबर चनकापूरे, दादाराव पाटील, प्रविण नंदागवळी, वामन नील, चरनदास वैरागडे, प्रतिभा सहारे, अनघा मेश्राम, रंजनी फुलझेले, ज्योत्स्ना बनसोडे, संगीता वनकर
प्रमुख उपस्थिती
- मा पद्माकर गणवीर, भारतीय बौद्ध महासभा - मा ॲड अजय निकोसे -मा प्रा एम एस वानखेडे, शिक्षक संघटना. - मा नरेंद्र सूर्यवंशी -मा श्यामराव हाडके -मा महेंद्र फुलझेले - मा शंकर ढेंगरे, भारतीय बौद्ध महासभा -मा संजय फुलझेले, भीम आर्मी, -मा प्रकाश बौद्ध, मा जयप्रकाश बौद्ध - मा चंद्रपाल सोनटक्के, मा. प्रा वंदना इंगळे, जिल्हा अध्यक्ष, -मा अशोक पाटील
विनीत : रवि पोथारे, राजेश ढेंगरे, कैलास खोंडे, अरविंद पाटील, अहिंसक लखोटे, कमलेश मेश्राम, सिताराम राठोड, राजन मेश्राम

सौजन्य
दैनिक बहुजन सौरभ, नागपूर

बहुजन सौरभ **संपादकीय**

# नागपूरचा ओबीसी मोर्चा हक्कासाठीचा निर्णायक लढा

ओबीसी समाज अनेक दशकांपासून सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक क्षेत्रात मागे राहिला आहे. शासनाने विविध आरक्षण योजना जाहीर केल्या, पण प्रत्यक्ष अंमलबजावणी, जागरूकता आणि योग्य वितरणाचा अभाव आजही अनेक समस्यांचे कारण आहे. 10 ऑक्टोबरचा मोर्चा या न्यायाच्या लढ्याला पुन्हा एकदा गती देण्याचा प्रयत्न आहे. आज महाराष्ट्राच्या नागपूरमध्ये हजारो ओबीसी बांधव न्यायासाठी, आपल्या हक्कासाठी मैदानात उतरले. हे केवळ एका जातीय संघर्षाचे आंदोलन नाही; हे भारतीय संविधानाने दिलेल्या अधिकारांचे रक्षण आणि त्यासाठीची जनआंदोलनाची जागरूकता आहे. हे आंदोलन फक्त एका आरक्षणाच्या हक्कासाठी नाही, तर आपल्या संघटित एकतेतून न्याय मिळवण्याच्या कठोर लढ्याचे प्रतिक आहे. 2 सप्टेंबरच्या जीआरच्या माध्यमातून ओबीसी आरक्षणावर घालण्यात आलेला घाला हा संविधानविरोधी आणि समाजविरोधी आहे. हे सरकारचे अतिक्रमण फक्त एका वर्गावर नाही; हे संपूर्ण सामाजिक न्यायावर धोकादायक आहे. विदर्भातील तमाम ओबीसी, एनटी, व्ही.जे., एस.बी.सी., एनटी वन, टू आणि थ्री यांनी एकत्र येऊन सरकारला हे समजून घ्यायला भाग पडेल, की आपल्या हक्कांची चुकवण्याची वेळ संपली आहे. ओबीसी मोर्चा फक्त एक आंदोलन नाही; तो ओबीसी समाजाच्या न्यायासाठी जागरूकता निर्माण करणारा, प्रशासनावर दबाव आणणारा आणि सामाजिक बदलासाठी मार्गदर्शक टप्पा आहे. जर रणनीतीप्रमाणे सारे काही व्यवस्थित झाले तर, हा मोर्चा ओबीसी समाजाच्या हक्कांसाठी निर्णायक ठरू शकतो. ओबीसी समाजाच्या प्रत्येक घटकासाठी हा दिवस स्मरणीय राहणार आहे. न्यायासाठी एकजुटीने उठाव, धैर्य आणि सातत्य ठेवणे हाच खरा संदेश आहे. यावेळी मोर्च्यावर उतरलेले लोक अत्यंत संयमशील, विवेकशील आणि न्यायप्रिय होते. हेच ओबीसीचे शस्त्र आहे. कुठल्याही परिस्थितीत अतिरेकाचा मार्ग निवडणे योग्य नाही; संविधानाच्या चौकटीत राहून मागण्या सरकारसमोर मांडायच्या आहेत. पण लक्षात ठेवा - ओबीसी एकता आणि ताकद हीच सरकारवर दबाव आणण्याची खरी साधन आहे. हे सर्व ओबीसी नेत्यांनी आपल्या भाषणातून सांगितले. ओबीसींना फक्त आरक्षण हवे आहे, कुणाच्याही अधिकारावर आघात न करता, पण आपल्या हक्काचे संरक्षण करत. विदर्भातील प्रत्येक ओबीसी बांधवांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की 19 टक्के आरक्षणासाठी तीन कोटी लोकसंख्या सहभागी झाली तरी हक्काचे संरक्षण न झाल्यास हे अन्याय सरकारने केलेला मानला जाईल. शिक्षण हक्क, सामाजिक व आर्थिक अधिकार, या सर्व गोष्टींबद्दल आपली मागणी संघटित स्वरूपात आणि ठामपणे मांडणे गरजेचे आहे. मंडल आयोग, नचीपण आयोग, जातनिहाय जनगणनेचा इतिहास आणि फुले, शाहू, आंबेडकरांच्या विचारधारा यांच्या प्रेरणेतून हे आंदोलन चालवले जात आहे. ‘जिसकी जितनी संख्या भारी, उसकी इतनी भागीदारी’ हे न्यायाचे तत्त्व इतर ओबीसी जनतेपर्यंत पोहोचवायला हवे. लोकसंख्या हीच ताकद आहे, आणि ही ताकद सरकारला ओबीसीच्या अधिकारांचा आदर करायला भाग पाडेल. नागपूर मोर्चा हे फक्त प्रदर्शन नाही; हे न्यायासाठी उभे राहण्याचे ऐतिहासिक आंदोलन आहे. दोन सप्टेंबरच्या जीआरला रद्द करून ओबीसींच्या आरक्षणाच्या हक्काचे संरक्षण करणे हीच आपली प्राथमिक आणि निर्णायक मागणी आहे. असे प्रत्येक नेत्याने आपल्या भाषणातून सांगितले, आपल्या एकतेत, संयमात आणि धैर्यातच आपला विजय दडलेला आहे. नागपूरच्या रस्त्यांवर उभे राहिलेले प्रत्येक बांधव, आपल्या अधिकारांसाठीच्या लढ्यातील शूर योद्धा होता. आणि हा लढा फक्त आज नाही; हा लढा आपल्या संततीसाठी, आपल्या समाजासाठी आणि आपल्या संविधानासाठी आहे. हे प्रत्येक कार्यकर्त्याला आता समजून चुकले आहे की अभी नहि तो कभी नही... ओबीसी म्हणजे केवळ आरक्षणाची मागणी करणारा समूह नव्हे; तर समाजातील मेहनती, उत्पादनक्षम, शेतकरी, कारागीर, लघुउद्योगातले कामगार, लघुव्यवसायिक – म्हणजे देशाचा कणा असलेला वर्ग आहे. पण हा वर्ग गेली अनेक वर्षं राजकीयदृष्ट्या वापरला गेला, सामाजिकदृष्ट्या विभागला गेला आणि आर्थिकदृष्ट्या मागे टाकला गेला. जेव्हा ओबीसी समाज रस्त्यावर उतरतो, तेव्हा ते केवळ आरक्षणासाठी नसते – ते मान्यतेसाठी, न्यायासाठी आणि स्वाभिमानासाठी असते. प्रश्न असा आहे की हे आंदोलन केवळ घोषणांमध्ये आणि फोटोंमध्ये थांबणार आहे का, की याला वास्तववादी दिशा मिळणार आहे? शक्तिप्रदर्शन हे आवश्यक आहे – कारण सत्ताधाऱ्यांना जनतेच्या भावनांचा अंदाज येण्यासाठी दडपण हवे असते. पण शक्तिप्रदर्शनानंतर काय? त्याचा पुढचा टप्पा म्हणजे संघटनशक्ती, विचारशक्ती आणि निर्णयशक्ती निर्माण करणे. जर प्रत्येक आंदोलनानंतर समाज पुन्हा पूर्वपदावर गेला, तर हक्कांसाठीची लढाई कायम अपूर्ण राहील. नागपूरचा ओबीसी मोर्चा म्हणजे फक्त ध्वज, नारे आणि घोषणांचा दिवस नाही; तर एक आत्मपरीक्षणाचा क्षण आहे. आपण का लढतो आहोत, कोणत्या दिशेने चाललो आहोत आणि पुढचा पाऊल काय असणार आहे – हे ठरवण्याचा दिवस आहे. शक्तिप्रदर्शन केले की समाजाची ताकद दिसते; पण हक्क मिळवण्यासाठी बुद्धी, रणनीती आणि एकता लागते. ओबीसी समाजाकडे ही तीनही शस्त्रे आहेत – फक्त त्यांचा योग्य उपयोग करायचा आहे. जर हे आंदोलन जागृतीचे माध्यम बनले, तर इतिहासात हा दिवस ‘ओबीसी एकतेचा आरंभदिन’ म्हणून ओळखला जाईल. पण जर हे केवळ राजकीय छायेत हरवून गेले, तर पुन्हा हक्कांसाठी आणखी एक मोर्चा उभा राहील. ■ ■

# मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे प्रश्न व त्यावरील मार्ग

**H 1B व्हिसा फी वाढीची कारणे, फॉरेन स्कॉलरशिप, मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे प्रश्न व त्यावर मार्ग. मागील काही वर्षापासून भारतातील मागासवर्गीय मुख्यत: SC/ST व OBC चे विद्यार्थी शासनाची foreign Scholarship घेऊन परदेशात उच्च शिक्षणासाठी जातात. संविधानाचे समता या तत्त्वावर आधारित या शिष्यवृत्तीचा उद्देश आहे. त्यानुसार उच्च शिक्षणाची समान संधी उपलब्ध करणे, गुणवंत आणि गरजू विद्यार्थी यांना उच्च शिक्षण घेण्यास सक्षम करणे, समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बळ घटकांना मुख्य प्रवाहात आणणे व सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या वंचित असलेल्या मागासवर्गीय घटकांना सक्षम बनवणे हा आहे.**

वास्तविक आधीपासूनच म्हणजे सुमारे 4-5 दशकापासूनच आर्थिक दृष्ट्या संपन्न असलेली उच्च वर्णिय मुले/मुली स्वत:च परदेशात उच्च शिक्षणासाठी जात होती व आजही जातात. उच्चशिक्षण घेतल्यानंतर तेथेच Job करुन डॉलर मधील कमाईमुळे ते आर्थिक दृष्ट्या लक्षणीय सक्षम झाले. एव्हढेच नाही तर परदेशातील मोठ्या कंपन्यात ते उच्च पदावर कार्यरत असून काही कंपन्यांचे भारतीय वंशाचे हेड म्हणून आज त्यांची ओळख निर्माण झाली आहे.
परंतु आर्थिक अडचणीमुळे मागासवर्ग विद्यार्थी यापासून कायमच वंचित राहीला ही वस्तुस्थिती आहे. त्याला ही संधी Foreign Scholarship मुळे मिळत आहे.
**अ) Foreign Scholarship चे स्वरुप :-** परदेशी शिष्यवृत्तीकरीता शासनाचे निकष अतिशय कठीण आहेत. सर्वात मुख्य अट ही जगातील टॉप विद्यापीठात प्रथम प्रवेश मिळवावा लागतो व नंतरच त्यांची निवड परदेशात उच्च शिक्षणाकरता करण्यात येते हे आपणा सर्वांनाच माहीती आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना प्रवास, स्टुडंट व्हिसा, विद्यापीठाची फी, पाठ्यक्रमाचे कालावधीकरीता निर्वाह भत्ता इ. खर्च मंजुर करण्यात येतो. त्यानंतर तो अमेरिकेच्या स्टुडंट व्हिसा(F-1) वर शिक्षणासाठी प्रवेश करतो. परदेशात उच्च शिक्षण प्राप्त केल्यानंतर घेतलेल्या शिक्षणानुसार त्याच देशात जॉब करुन स्वत: व कुटुंबास आर्थिक दृष्ट्या सक्षम करणे हा हेतु असतो. अमेरिकेतील आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना




केवळ 60 दिवस त्यांच्या पदवीच्या तारखेनंतर अमेरिकेत राहण्याची परवानगी आहे व येथेच त्याला H 1B व्हिसाची गरज पडते. म्हणून आपण H 1Bव्हिसावर काय आहे ते जाणून घेऊ.
**ब)H 1Bव्हिसाची ठळक वैशिष्ट्ये :-** अमेरिकेतील कंपन्यांना विशेष कौशल्य लागणाऱ्या पदावरती परदेशी नागरिक नेमण्याची मुभा असते. या व्हिसाची ठळक वैशिष्ट्ये
1) हा व्हिसा मुख्यत: STEM म्हणजे सायन्स, तंत्रज्ञान, इंजिनिअरींग व गणित इ. विषयात पारंगत असलेल्या कुशल लोकांकरीता वापरण्यात येतो 2) या व्हिसासाठी कंपनीच अर्ज करते व तेच यांची फी भरतात. 3) या व्हिसाची मागणी जास्त असल्यामुळे त्याअंतर्गत निवड ही लॉटरी द्वारे करण्यात येते. 4)त्याची मुदत प्रथम 3 वर्षासाठी होती व अमेरिका प्रशासनाने ती एक वर्ष केल्याचे कळते. या व्हिसाकरीता प्रथम फी ही रु 6.0 लक्ष होती ती आता अमेरिकन प्रशासनाने रु ८८.0 लक्ष केली आहे.
**क) H 1B व्हिसा फी वाढीची कारणे :-** ही फी अमेरिकेने एकाएकी वाढविण्याची कारण अमेरिका प्रशासनाने स्विकारलेल्या अमेरिका फर्स्ट या धोरणामुळे आहे. संक्षिप्तपणे America first याचा अर्थ, इतर राष्ट्रे आणि लोकांच्या हिताच्या आधी, अमेरिकेच्या हिताचे कामास प्राधान्य असणारे परराष्ट्रीय धोरण व देशांतर्गत परिस्थिती अनुरूप धोरणात्मक निर्णय घेण्यावर भर देणे असा आहे. त्या अनुषंगाने अमेरिकन प्रशासनाने H 1B व्हिसावर संशोधन करुन H 1Bव्हिसावर इतर देशातुन येणाऱ्या परकीय नागरिकाबाबत खालील बाबी निदर्शनास आल्या.
1) 2023 मध्ये H 1Bमधील IT क्षेत्राची मागणी 32टक्के होती ती आता 65टक्के झाली आहे. ही वाढ म्हणजेच अमेरिकन लोकांना तेव्हढ्या नोकऱ्या कमी होण्याचे संकेत वाटते. 2) H 1B व्हिसाकरीता लागणारे शुल्क कमी असल्यामुळे त्याचा दुरुपयोग होउन या क्षेत्रात कमी कौशल्य असलेले लोक येत आहेत. 3) काही अमेरिकन कंपन्या, अमेरिकन लोकांना काढून कमी पैशात काम करणाऱ्या विदेशातील लोकांना नोकरीवर ठेवत आहेत. त्यामुळे अमेरिका प्रशाससाने अमेरिकेच्या हिताकरीता H 1B व्हिसाच्या फी वाढीचा निर्णय घेतला. हा जरी अमेरिकेचा अंतर्गत प्रश्न असला तरी यामुळे परदेशात उच्च शिक्षण घेणारे भारतीय मुख्यत्वेकरून करुन मागासवर्गीय विद्यार्थ्यांपुढे संकट निर्माण झाले आहे. पुर्वी फी कमी असल्यामुळे तेथील साधारण कंपन्याही उच्च शिक्षण संपल्यावर या फ्रेशरना सामावून घेत असत. परंतु लक्षणीय फी वाढीमुळे मोठ्या कंपन्यासुद्धा त्यांना सामावून घेण्यास तयार नाहीत. आर्थिक क्षमता नसतांना खुप परिश्रम करून उच्च शिक्षण घेऊन जर व्हिसा फी वाढीमुळे Job मिळण्यास अडचण असेल तर



इंजि. नरेंद्र ताकसांडे
मो.9422922668

उच्च शिक्षणाचा काय उपयोग असा प्रश्न त्यांच्यापुढे निर्माण झाला आहे. तथापि यामुळे खचून जायची आवश्यक्ता नाही. यासाठी पर्यायी मार्ग उपलब्ध आहेत.
**ड) मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता उपलब्ध मार्ग :**
1) जगातील टॉप 100 विद्यापीठपैकी एकट्या अमेरिकेत 36 विद्यापीठ आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचा तेथे जाण्याचा कल प्रथम असतो. तेथे भेदभाव नसल्यामुळे वातावरणही पोषक आहे. तथापि प्राप्त परिस्थितीत त्यात बदल करणे आवश्यक आहे. भविष्यात अमेरिका H 1B व्हिसाचे नियम आणखी घट्ट करण्याची शक्यता असल्याचे वृत्त आहे. अर्थातच उच्च Talent असलेल्या विद्यार्थ्यांना तेथील कंपन्या सामावून घेतात. तरी पण खुप सावधानता बाळगुन तेथे प्रवेश घ्यावा. 2) अमेरिके पाठोपाठ जगातील टॉप 100 विद्यापीठापैकी 38 विद्यापीठ युरोप आणि ऑस्ट्रेलिया खंडातील विविध देश व कॅनडा येथे आहेत. तेथील वातावरण अमेरिकेसारखेच पोषक आहे व तेथे व्हिसाचे नियमही शिथिल आहेत. प्राप्त परिस्थितीत तेथील विद्यापीठात प्रवेश घेण्यास प्रथम प्राथमिकता देणे उचित राहील. 3) उर्वरित 26 विद्यापीठ हे चीन, हॉंगकॉंग, कोरिया रशिया व इतर देशात आहेत. तेथेही व्हिसाचे नियम शिथिल आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी त्याची दुय्यम प्राथमिकता म्हणून या विद्यापीठाची निवड करता येईल. 4) परदेशात कुठल्याही देशात जातांना तेथील व्हिसाचे नियमाचा व पर्याय याचा पुरेपुर अभ्यास असणे आवश्यक आहे. अन्यथा संकट उभे राहू शकते. उदा. स्टुडंट व्हिसाचा कालावधी संपल्यानंतर ग्रेस कालावधी वगळता तेथे रहाणे Unlawful असते व त्याचा परिणाम Deportation होऊ शकतो. परंतु अशा परिस्थितीत तेथील इमिग्रेशन ॲडव्होकेटचा सल्ला घेतल्यास ही कार्यवाही शिथिल होउ शकते.
यासाठी शासनाने Foreign Scholarship करीता व्हिसाचे विविध देशांतील नियम, त्यातील अद्ययावत बदल व Standard Operting Procedure (SOP) इ. द्वारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केल्यास त्यांचा आत्मविश्वास वाढेल व अकस्मात येणाऱ्या परिस्थितीचा ते सामना करु शकतील.
जाता जाता अमेरिका प्रशासनाने तेथील बेरोजगारी कमी करण्याकरीता पुर्ण विचाराअंती आवश्यक पावले उचलली आहेत. ती इतरांकरीता योग्य नसतील पण ते अमेरिकेच्या हिताचे दृष्टिने योग्य आहेत. भारतातील बेरोजगारी हेही एक मोठे आव्हान आहे. परंतु येथील नेते मंडळीत याबाबतीत कुठलेही व्हिजन नाही याची खंत वाटते. ■ ■

# अमृतकाळातील ‘विषारी बूट’

भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर राकेश किशोर तिवारी नावाच्या वकिलाने बूट फेकला. कारण होते, भगवान विष्णूच्या मूर्तीच्या जिर्णोद्धाराची! वास्तविक हे मंदीर पुरातत्व विभागाच्या अखत्यारीतील. त्यामुळे न्यायालयाने ही याचिका फेटाळली. निर्णय देतांना सरन्यायाधीश गवई म्हणाले, ‘जर तुम्ही खरे विष्णुभक्त असाल तर देवाला प्रार्थना करा. देवालाच काय ते विचारा.’ या वाक्यात काय चूक आहे? यात संताप येण्यासारखे काय आहे? परंतु याचा सनातन्यांना धर्माचा अपमान वाटला. अपमान केला म्हणून संविधानच पायदळी तुडविले. उलट हजारो वर्षापासून ज्यांच्यावर गुलामी लादली, अपमानास्पद वागणूक दिली, अनेकांचे बळी घेतले, तेव्हा तो अपमान नव्हता काय? भूषण गवई सरन्यायाधीश झाल्यावर जेव्हा पहिल्यांदा मुंबईत आले, तेव्हा प्रोटोकॉल नुसार कोणताही मोठा अधिकारी त्यांना भेटण्यास गेला नव्हता. हा सरन्यायाधीशांचा अपमान नव्हता काय? आज राकेश तिवारी नामक माथेफिरु विविध वृत्तवाहिन्यांवर निर्लज्जपणे मुलाखती देत आहे. बूट भिरकावला म्हणून स्वत:ला गौरवान्वित आहे. परमात्म्याने माझ्याकडून जे करवून घेतले ते मी केले. मला कोणतेही दु:ख नाही, मी माफी मागणार नाही, असे तो बरळतो आहे. परमात्म्याने हे घडविले असते तर सरन्यायाधीशांनी याचिका फेटाळली ती सुद्धा परमात्म्याने फेटाळली असे का म्हणू नये? अंधभक्त हल्ला करणाऱ्यावर स्तुती सुमने उधळत आहेत. या देशात सरन्यायाधीशांची पूर्वीची जात कोणती, धर्म कोणता? यावरून मूल्यमापन होत असेल तर आपण नक्की अश्मयुगात जगत आहोत की काय? असे वाटते. या घटनेची सर्व क्षेत्रातून निंदा, निषेध केला जात आहे. देशात असंतोषाची लाट पसरली आहे. या विकृतीतून त्यांची जातीवादी मानसिकता उघड झाली असून ‘कायद्याचे राज्य’ या संकल्पनेला नाकारणारी आहे. भारताच्या इतिहासात सर्वोच्च व्यक्तीविषयी इतकी जहरी जातीयवादी घटना प्रथमच घडत आहे. ही मनुवाद्यांच्या अनैतिकतेची निच्चांकी पातळी आहे. संविधान सभेत 25 नोव्हेंबर 1949 रोजी केलेल्या अखेरच्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशातील सामाजिक विषमतेविषयी चिंता व्यक्त केली होती. ती आजही तितकीच खरी आहे. स्वातंत्र्याच्या 75 वर्षानंतरही त्यात किंचितही फरक पडला नाही. सनातन्यांचा धार्मिक उन्माद, उच्च-नीचतेची भावना या प्रकरणात उफाळून आली आहे. हा केवळ सरन्यायाधीश गवई यांचा अपमान नाही. हा संविधानाचा, न्यायव्यवस्थेचा अपमान आहे, संविधानावर आघात आहे, देशद्रोह आहे. तो दलित समाजाच्या स्वसन्मानावर प्रहार करणारा आहे. अशा देशद्रोही व्यक्तिला संविधानात शिक्षेची तरतूद आहे. परंतु या घटनेमागे कोणाचा तरी आशीर्वाद असल्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या ॲटर्नी जनरल कार्यालयाने संबंधित वकीलावर अवमान प्रकरण दाखल करण्यास नकार दिला. देशाच्या सरन्यायाधीशांविषयी असा अवमान आणि तिरस्कार बळावत असेल, ते अपमानजनक वृत्तीचा बळी ठरत असतील तर सामान्य नागरिकांच्या






श्रीराम बनसोड,
8208617748

सुरक्षिततेची हमी कोण घेणार? गवईच्या जागी दुसरा उच्चवर्णीय सरन्यायाधीश असता तर त्याला अशी विषारी वागणूक मिळाली असती काय? आज शिक्षणामुळे आंबेडकरी समाज भीतीमुक्त झाला असा समज आहे. पण आजची वास्तविकता काय दर्शविते? एखाद्या मागासवर्गीयाने ही कृती केली असती तर नक्कीच देश पेटला असता. त्याला त्वरित तुरुंगात डांबले असते. परंतु या अराजक, देशद्रोही व्यक्तीवर कोणतीही कारवाई न करता दिल्ली पोलीस मुकदर्शक बनले. यावर सरकारची कारवाई सुद्धा झाल्याचे आढळत नाही. न्यायाधीश वर्माच्या घरात नोटांचे ढीग मिळाले होते, त्यावर सुद्धा कारवाई झाली नाही. राकेश तिवारी हा सुद्धा त्याच माळेतील मणी! ‘ब्राह्मण कितीही भ्रष्ट तरी तिन्ही लोकी श्रेष्ठ’! हीच आजची अवस्था दर्शवते. अंधभक्त मागील दोन महिन्यांपासून सरन्यायाधीश गवई यांना समाजमाध्यमांतून ट्रोल करत आहेत. बूट फेकीस समर्थन करून हिंसा भडकवत आहेत. यावर संघ, भाजपची कुठे प्रतिक्रिया नाही. सरन्यायाधीशांच्या आईला आमंत्रित करणारे मोहन भागवत कुठे आहेत? निमंत्रण नाकारले म्हणून ही तर ही कृती झाली नसावी? या वकिलाची हिम्मत झालीच कशी? भविष्यात ही वहिवाट झाली तर देश अराजकतेकडे जाणार नाही काय? अपमानजनक वक्तव्ये, धमक्या, विषारी प्रचार खुलेपणाने होत आहे. सरकारचे मौन असणे अशा दुष्कृत्यांना समर्थनच दर्शविते. या निर्ढावलेल्या तिवारीला मात्र कोणताही पश्चाताप झाला नाही. परमेश्वराने हे कृत्य करण्यास सांगितले असे बेशरमपणाने तो बरळत आहे. या घटनेनंतर सरन्यायाधीश गवई शांत होते. ते विचलित झाले नाही. त्याच्यावर कार्यवाई करू नका असे त्यांनी म्हटले. त्या वकीलाचा बूट सन्मानाने परत केला. तत्कालीन समाजव्यवस्थेत डॉ. बाबासाहेब विचलित झाले नसते तर काय झाले असते? महाडचा सत्याग्रह घडला असताही नसता. डॉ. बाबासाहेब विचलित झाले म्हणून माणसाला माणुसकी मिळाली. महिलांना पुरुषाप्रमाणे अधिकार प्राप्त झाले, विचलित झाले म्हणून शैक्षणिक क्रांती झाली. डॉ. बाबासाहेब म्हणतात, ‘भाकरी मिळविण्यासाठी स्वाभिमान विकू नका. भाकरीपेक्षा स्वाभिमान महत्वाचा आहे. त्यामुळे सरन्यायाधीशांची गांधीगिरी यावेळी अप्रासंगिक वाटते. या गांधीगिरीमुळे कदाचित लोकांची सहानुभूती मिळेलही, परंतु स्वाभिमान निर्माण होणार नाही. अपमान सहन करणे म्हणजे नम्रता नव्हे, अन्यायाला मौन संमती देणे होय. या प्रसंगातून जातीयता पाळणाऱ्यांचे धारिष्ट वाढणार आहे. ही करुणा नसून अन्यायाविरोधात निष्क्रियता दर्शवणे होय. भविष्यात दैवी संकेताचा आधार घेऊन कोणीही गुन्हेगार आपल्या विकृतीचे समर्थन करेल, तेव्हा सामान्य नागरिकांचा न्याय या संकल्पनेवरील विश्वासच संपुष्टात येईल. अर्थात सरन्यायाधीशांनी आरोपीवर कोणतीही कारवाई करू नये असे सांगितले असले तरी न्यायालयीन प्रशासन विभाग, रजिस्ट्रार आणि पोलिस विभाग यांनी गुन्हा नोंदवायला पाहिजे होता. तरच असे भ्याड कृत्ये करण्यावर निर्बंध लादले जातील आणि असे दुष्कृत्य करण्यास कोणीही धजावणार नाही. या भ्याड हल्ल्याचा कितीही निषेध केला तरी तो कमी आहे! ■ ■

# कुठवरी भोगशिल मौजा ? मग येती यमाच्या फौजा रे!

सन 2009 हे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे जन्मशताब्दी वर्ष. या सोहळ्याची सांगता 2011 साली गुरूकुंज येथे तत्कालीन भारताच्या महामहीम राष्ट्रपती सौ. प्रतिभाताई पाटील यांच्या उपस्थितीत झाली. राष्ट्रसंतांच्या जन्मशताब्दीच्या या पर्वात आम्ही गुरूदेव सेवक भारतभर त्यांच्या विचारांना कितपत पोहोचवू शकलो? किती ग्रामांना ग्रामगीतेच्या विचारातून स्वावलंबी करू शकलो? हा संशोधनाचा विषय आहे. शासनाच्या निधीतून काही गावांच्या नाल्या, रस्ते, ग्रामपंचायत भवन चकाचक झाले आणि त्याचे श्रेय लाटण्याचा खेळ सुरू झाला. आम्ही सारे ‘कृतार्थ’ झालो. भलेही आजही गुरूदेव सेवा मंडळाचा विचार संपूर्ण विदर्भात पोहोचला नसेल, पण आमचा अविर्भाव अखिल भारतीय आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या जन्मशताब्दीची देण जर काही असेल, तर ती म्हणजे राष्ट्रसंतांच्या लिखित अंतिम इच्छेविरुद्ध समाधीस्थळावर हनुमंतरायांचे आगमन!
या विषयावर एक चर्चा तळमळीच्या गुरूदेव सेवकांनी समाधी परिसरात 3 जुलै 2018 रोजी आयोजित केली. सत्ताधारी गुरूदेवभक्त जागे झाले. त्यांनी प्रार्थना केली की, ‘ही चर्चा खुल्या मैदानात न घेता गुरूकुंज आश्रम परिसरात घ्या.’ गुरूदेव सेवकांनी नम्रतेने ते मान्य केले.
चर्चेचे अध्यक्ष गुरूदेव प्रचारक देवीदास लाखे (दादा) होते. सोबत मनोहर साबळे, रवीदादा मानव, राहुल देवघरे, ज्ञानेश्वर रक्षक, हेमंत टाले, मोहन चोरे आणि इतर काही सेवक सहभागी झाले. सत्ताधारी सर्वाधिकारी प्रकाश वाघ, सचिव जनार्दन बोथे, राजा बोथे, ॲड. दिलीप कोहळे हेही महत्वाचे पदाधिकारी चर्चेत सहभागी होते. पत्रकार स्वप्नील उमप यांनी तटस्थ भूमिकेतून चर्चेचे निरीक्षण केले. चर्चा हनुमंतरायांच्या आगमनावरून रंगली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या अंतिम इच्छेच्या आर्त संदेशाचे शब्दनशब्द वाचन करण्यात आले. राष्ट्रसंतांच्या इच्छेला कुठेही तडा जाणार नाही, असे सर्वाधिकारी प्रकाश वाघ यांनी चर्चेत स्पष्ट केले. ते म्हणाले, ‘आम्ही हनुमंतरायांसाठी जागा शोधत आहोत.’



मनोहर साबळे यांनी दोन पर्याय सुचवले –
1. स्वामी सितारामदास महाराजांच्या वास्तव्याने पुनीत झालेल्या गुरूकुंज आश्रमातील झोपडी आणि
2. राष्ट्रसंतांच्या समाधीजवळ असलेले जनार्दन बोथे सरांचे ग्रीन हाऊस.
चर्चा रंगली, हसत-खेळत आश्वासन दिले गेले आणि आम्ही गुरूदेव सेवकांनी त्यावर विश्वास ठेवला. कारण जनार्दनपंतांना राष्ट्रसंतांचा सहवास लाभलेला. ते सांगतात की राष्ट्रसंतांचे निज सचिव म्हणून त्यांनी काम पाहिले. ते ध्यान-प्रार्थना कधीही चुकवत नसत.
सर्वाधिकारी प्रकाश वाघ हे आश्वासनाचे पक्के कीर्तनकार, ग्रामगीतेचे प्रवचनकार, त्यांचे जीवन सत्यावर आधारलेले. ॲड. दिलीप कोहळे हे राष्ट्रसंतांच्या साहित्याचे राष्ट्रीय व्याख्याते आणि कायद्याचे अभ्यासक. राजा बोथे हे गुरूकुंजाच्या प्रत्येक कणाचा प्रभाव अंगी बाळगणारे.

**जनक्रांतीच्या पाऊलवाटा**



ज्ञानेश्वर दुर्गादास रक्षक
मो. 9823966282

सारेच विश्वासू, गुरूदेव भक्त, राष्ट्रसंतांच्या विचाराला आणि शब्दाला जागणारे.
परंतु... चर्चेत दिलेल्या आश्वासनानंतर कोरोनाच्या महामारीच्या काळात हनुमंतरायांना ग्रॅनाइटच्या ओट्यावर नेहमीसाठी बंदिस्त करण्यात आले. आरत्या सुरू झाल्या. समाधी परिसराच्या ‘चमत्कारी’ कथांना प्रारंभ झाला. आता चमत्कार नवसाला पावतील, भव्यमंदिर उभे राहील, कारण आमची अंधभक्ती




गुरूदेवाला पावते!
गुरूदेवाच्या साक्षात्कारातून त्यांच्याच धनातून आम्ही महागडे वकील ठेवतो, कोर्टकचेऱ्यांचा खेळ खेळतो आणि अनेकांचे जीवन उद्ध्वस्त करतो, हेच आम्ही आमचे ‘कर्तव्य’ मानतो.
आमचा विरोध, निषेध करण्याची ताकद गुरूदेवांनी कोणालाच दिली नाही, असे अंधभक्त बोलतात.
आणि आम्ही ऐकत राहतो...
जय गुरू!
गुरूदेवांचा संदेश -
‘जो सत्याविण शब्द न बोले, सहजहि कोणासी ।
मित्रा, कर मैत्री त्याची ।
चरित्र निर्मळ, राहणी साधी, निंदि न कवणासी ।
दिनचर्या सततची योग्य ती, हाव न मानाची ।
मित्रा, कर मैत्री त्याची ।’
शेवटी मित्रांनो, प्रत्येकाला मृत्यूच्या भेटीसाठी जावेच लागते, ही आठवण राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सतत करून देतात.
कुठवरी भोगशिल मौजा? मग येती यमाच्या फौजा रे!
धन-दारा-सुत-साथी सगळे, राखतील दरवाजा।
अंतकाळी देतील लोटुनी, काढुनी घेती बाजा रे!
हालिमहाली पोते सगळे, आजच म्हणती ‘राजा’।
शेवट कोणी साथ करीना, का भुलसी या राजा रे!
चौर्यांशीचा फेरा पडतो, कोण भोगी तव आजा?
तुकड्यादास म्हणे भय मोठे, भज-भज सदगुरुराजा रे!
मित्रांनो, करा चिंतन! ■ ■

## गूगल अमेरिकन कंपनी आहे की भारतीय ?

# ट्रम्पचा सुंदर पिचाईना इशारा

‘मला धमकावण्याचा प्रयत्न करू नका. मला शिक्षण आणि ज्ञान भारताने दिले आहे. मी केवळ अमेरिकेची सेवा करत नाही, मी मानवतेची सेवा करतो.’ सुंदर पिचाईंचे जोरदार उत्तर!
वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये, जेव्हा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जागतिक पातळीवर भारताला कमी दाखवण्याचा प्रयत्न केला, तेव्हा गूगलचे सीईओ सुंदर पिचाई यांनी शांत पण ठाम उत्तर देत आंतरराष्ट्रीय स्तरावर खळबळ उडवली. हे केवळ शब्दांचे युद्ध नव्हते, तर ते होते - आत्मसन्मान, सामर्थ्य आणि खऱ्या नेतृत्वाचे प्रतीक. या परिषदेत भारताचे प्रतिनिधित्व परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर आणि गूगलचे सीईओ सुंदर पिचाई यांनी केले. त्यावेळी ट्रम्प म्हणाले, ‘भारत तंत्रज्ञान आणि लोकशाहीबद्दल बरेच बोलतो. पण अमेरिकन कंपन्या आणि अमेरिकन संस्थांशिवाय भारताने हा प्रगतीचा टप्पा गाठला असता का?’
भारताला कमी लेखण्याचा हा प्रयत्न पाहून जयशंकर यांनी पिचाईंना उत्तर देण्याचा इशारा केला. पिचाई बोलू लागले. त्यांच्या आवाजात नम्रता होती, पण शब्दांत वजन आणि ठामपणा होता, ‘सर, मी भारतात जन्मलो. माझ्या देशाने मला शिक्षण दिले, मूल्ये शिकवली. ज्ञान आणि तंत्रज्ञानाला पासपोर्ट लागत नाही. भारतीय शिक्षक, अभियंते आणि कुटुंबांनी केलेल्या त्यागामुळे माझा प्रवास शक्य झाला.’ सुंदर पिचाईंच्या या स्पष्ट उत्तराने ट्रम्प काही काळ स्तब्ध झाले. थोड्याच वेळात जयशंकर म्हणाले, ‘भागीदारी ही कमजोरी नसते, ती ताकद असते’ आणि भारताचा सन्मान उंचावला. सभागृह टाळ्यांच्या गजराने दुमदुमले. दुसऱ्या दिवशी ट्रम्प पुन्हा भारताला दबावाखाली आणण्याचा प्रयत्न करत म्हणाले, ‘जर भारताने अमेरिकन नियमांचे उल्लंघन केले, तर त्याला व्यापार निर्बंधांना सामोरे जावे लागेल. मला स्पष्ट सांगा, सुंदर, गूगल अमेरिकेसोबत आहे का भारतासोबत?’
पिचाई काही क्षण शांत राहिले आणि नंतर उत्तरले, ‘मी नेहमी मानवतेची सेवा प्रथम करेन. अमेरिकेने मला संधी दिली, भारताने मला मुळे दिली. एका देशाचा सन्मान करण्यासाठी मला दुसऱ्याला नाकारायची गरज नाही. मी जेव्हा नवनिर्मिती करतो, काही घडवतो, तेव्हा मी दोन्ही राष्ट्रांची सेवा करतो. मी सर्वांची




सेवा करतो.’ त्यांच्या या शब्दांनी राष्ट्रांच्या पलीकडे जाऊन मानवतें महत्व अधोरेखित झाले. पुन्हा एकदा सभागृहात जोरदार टाळ्यांचा कडकडाट झाला.
शिखर परिषदेच्या अंतिम दिवशी ट्रम्प यांनी उघडपणे धमकी दिली, ‘भारताने आज रात्रीपर्यंत अमेरिकेसाठी आपला बाजार पूर्णपणे खुला करावा. अन्यथा त्याला निर्बंधांना सामोरे जावे लागेल. सुंदर पिचाई, मला आत्ता उत्तर द्या - गूगल अमेरिकेसोबत आहे का भारतासोबत?’
सुंदर पिचाई शांतपणे उभे राहिले आणि ठामपणे म्हणाले, ‘जर एखादा देश किंवा एखादी व्यक्ती मला धमकावण्याचा प्रयत्न करत असेल, तर मी भीतीमुळे झुकणार नाही. मी कधीही दबावाखाली झुकणार नाही. मी फक्त सन्मानापुढे नतमस्तक होतो, कधीही जबरदस्तीपुढे नाही. कोणतेही राष्ट्र असो, जर त्याने अधीनतेची मागणी केली, तर मी कधीही शरण जाणार नाही.’
सभागृहात उपस्थित सर्व नेते उभे राहून पिचाईंच्या धाडसी भूमिकेला दाद देऊ लागले.
ही परिषद केवळ व्यावसायिक चर्चा राहिली नाही - ती मानवता, नेतृत्व आणि तत्त्वांचा टर्निंग पॉईंट ठरली. सुंदर पिचाईंच्या शब्दांनी लाखो तरुणांच्या मनात आशा आणि अभिमान निर्माण केला. त्यांनी सत्तेपुढे झुकण्याऐवजी नम्रता, आदर आणि सत्याचे रक्षण करून एका राष्ट्राचा सन्मान जपला. या घटनेने पुन्हा एकदा जागतिक इतिहासात ठामपणे अधोरेखित झाले - तत्त्वं ही सत्तेपेक्षा श्रेष्ठ असतात! ■ ■

■ ■ बसौसे ■ ■

“ शील आणि ज्ञान या दोहोंमुळे संपूर्ण श्रेष्ठता प्राप्त होते... ”





# संपर्क आणि लगाव मध्ये नेमका काय फरक...?

घटना न्यूयार्कमधील आहे. एका भारतीय साधूचे तिथे व्याख्यान झाले. त्यानंतर पत्रकारांनी त्यांना गाठले. त्यातील एकाने साधूला विचारले, `साधू महाराज, तुम्ही आताच्या व्याख्यानात संपर्क आणि लगाव यावर बोलला. पण ते गोंधळात टाकणार आहे. या दोन्हीमध्ये फरक काय ?'

साधुने मंद स्मित केले अन उत्तर देण्याऐवजी वेगळेच प्रश्न त्यांनी त्या पत्रकाराला विचारणे सुरु केले.

साधू : तुम्ही न्यूयार्कचे रहिवासी का ?
पत्रकार : येस! का हो ?
साधू : घरी कोण कोण असते ?

आपल्या प्रश्नाचे उत्तर टाळण्यासाठी साधूबाबा असे काहीतरी वेगळे विचारत आहेत असे त्या पत्रकाराला वाटले. कारण त्याचा प्रश्न सार्वजनिक होता, अन साधू तर खाजगी काहीतरी विचारत होते.

तरी मूळ प्रश्नाचे `उत्तर' मिळण्याच्या आशेने तो पत्रकार उत्तर देत गेला.

तो म्हणाला, `माझी आई आता नाहीये. वडील व आम्ही तिघे भाऊ बहीण! सगळ्यांची लग्न झाली आहेत. सेपरेट बंगले असून सर्व सेटल आहेत.



सागर रामभाऊ तायडे
9920403859

साधू : तुम्ही तुमच्या वडिलांशी बोलत असता का ? (आता मात्र त्या पत्रकाराला थोडा राग यायला लागला.)
साधू : तुमच्या वडिलांशी शेवटचे तुम्ही कधी बोलला ? काही आठवतेय का ?
पत्रकाराने राग आवरत सांगितले : बहुतेक एक महिना झाला असावा.
साधू : तुमच्या बहीण भावाशी नेहमी भेटीगाठी करता का ?
एक कुटुंबीय म्हणून शेवटचे तुम्ही कधी एकत्र भेटले ?
(आता पत्रकाराच्या कपाळावर घाम यायला लागला, की मुलाखत कोण कुणाची घेतेय ?)
तरी त्याने उत्तर दिले : गेल्या वर्षीच्या ख्रिसमसमध्ये भेटलो.
साधू : त्यावेळी किती दिवस एकत्र होता ?
पत्रकार (हळवा होत) : तीन दिवस होतो.
साधू : तुम्ही बहीण भावांनी त्या काळात किती वेळ वडिलांच्या अगदी जवळ बसून घालवला ?
(पत्रकार आता थोडा लाजिरवाणा होऊन, मान खाली घालून कागदावर काहीतरी रेघोट्या मारत बसला.)
साधू : तुम्ही तुमच्या वडिलांसोबत नाश्ता, दुपारचे जेवण किंवा रात्रीचे जेवण केले का ? वडिलांना विचारले का ? की कसे आहात ? आईच्या निधनानंतर ते एकटे जगत होते तर वेळ कसा घालवला ?
(असे म्हणत त्या साधूने पत्रकाराला आपुलकीने जवळ घेतले).
साधू : बेटा, नाराज होऊ नको, लाजिरवाणा पण होऊ नको.

तुला असे नकळत दुखावल्याबद्दल उलट मी माफी मागतो. पण तुझ्या मूळ प्रश्नाचे उत्तर यात होते. तू तुझ्या वडिलांच्या फक्त Contact मध्ये आहेस. मात्र तुझे त्यांच्याशी कोणतेही Connection नाहीय. You are not connected to him आणि वडील संपर्कात असणे वेगळे अन त्यांच्याशी `लगावे' असणे वेगळे. कारण Connection हे नेहमी आत्म्याचे आत्म्याशी होत असते.

एकत्र बसणे, भोजन सहवास, एकमेकांची काळजी घेणे, डोळ्यांनी संपर्कात नव्हे तर डोळ्याची भाषा ओळखून त्यानुसार प्रतिसाद देणे, आपुलकीचा स्पर्श, हात हातात घेणे, हे सगळे Connection मध्ये येत. Contact मध्ये नाही...

तुम्ही तुमची भावंडे, वडील यांच्या Contact मध्ये आहात पण कोणतेच Connection आपसात नाही.

आता पत्रकाराच्या डोळ्यात पाणी आले.

एक चांगला धडा गिरवून दिल्याबद्दल आभार मानून, पत्रकार त्यांना नमस्कार करून निघाला.

आज आपल्या भोवताली बहुतेक असेच दिसतेय. आपण आपले सख्खे नातेवाईक, आपले मित्र, आपले शेजारी, सहकारी, समाज...सर्व फक्त Contact मधे ठेवतो आणी गरज पडली की लगेच Connection जोडतो...

सर्व एकमेकांच्या Contact मध्ये आहेत पण कुणाशी Connection (लगाव असा) काही नाही.

कसला संवाद नाही, कसल्या चर्चा नाहीत, सगळे स्वमग्न झालेत...! आपण वरचेवर बदलत चाललोय. हेच खरे आहे..!

इतक्या वर्षाचे आपले संस्कार, आईवडील गुरुजींनी शिकवलेले ते सगळे विसरले जातेय. कुणाला जवळ करायचे, कधी जवळ करायचे, हे चांगलेच समजायला लागलेय. प्राधान्य कशाला द्यायचे हा भावनिक व्यवहार आपण चांगलाच अंगीकारला आहे.

गरज पडेल तेव्हा बघू ही वृत्ती आपण चांगलीच जोपासली आहे. वाटले तर प्रतिसाद द्यायचा, नाहीतर मोबाईल सायलेंटवर होता म्हणून सोयीचे व ठेवणीतले उत्तर तयार ठेवायचे! दाहक असले, तरी सत्य हेच आहे.

संपर्क, संवाद वाढवणे, एकमेकांना समजून घेणे, जाणून घेणे म्हणजेच Connection.

कॉन्टॅक्ट या शब्दाचा अर्थ मराठीत `संपर्क' असा होतो, जो संवाद साधणे, स्पर्श करणे किंवा एखाद्या व्यक्तीशी नातेसंबंध असणे दर्शवतो. हा शब्द क्रियापद म्हणून वापरल्यास `संपर्क साधणे' किंवा `संपर्कात राहणे' असा अर्थ होतो, तर नाम म्हणून वापरल्यास `एखाद्याशी असलेला संबंध' किंवा `माहिती देणारी व्यक्ती' असा अर्थ होतो.

`कनेक्शन्स' या शब्दाचा अर्थ जोडण्या किंवा संबंध असा होतो, जिथे दोन गोष्टी, व्यक्ती किंवा गटांमध्ये एक दुवा असतो. हे शारीरिक जोडणी (उदा. वायर किंवा पाईपची जोडणी) किंवा वैचारिक जोडणी (उदा. दोन विचारांमधील संबंध) असू शकते. वरील घटनेतील `साधू' म्हणजे दुसरे तिसरे कोणी नसून आपले स्वामी विवेकानंद होते. ■ ■

---

# जातींचा नाईनाट

वर्णाश्रमासोबत हिंदूंना ब्राम्हणांनी दिलेली सर्वात मोठी देणगी म्हणजे जात होय. भारतात एकूण 6500 पेक्षा अधिक जाती असून यामध्ये अस्पृश्यांच्या जवळपास 1000 जाती आहेत. अनुसूचित जाती महाराष्ट्रात 59 आहेत. त्यामध्ये मुख्यतः चार प्रमुख जाती आहेत. 1) महार 2) चांभार 3) मांग 4) भंगी / मेहतर. अनुसूचित जातींचे प्रमाण हे राज्याच्या लोकसंख्येच्या 11टक्के आहे. ब्राम्हणांइतकेच या कनिष्ठ जातींवर अधिक हक्क गाजविणारे कुणबी, तेली, माळी आदी जाती आहेत. जातीच्या निर्मितीत जेव्हा शुद्र वर्णाच्या अन्यायाला चिडून प्रतिरोध दर्शविला गेला, तेव्हा या विरोधी लोकांना शांत करण्यासाठी ब्राम्हणांनी जातीच्या सुधारणेत बदल करून या प्रतीरोधींना तेली, कुणबी, माळी आदी जातीत परावर्तीत केले. या जातींना कनिष्ठ जातीवर वर्चस्व जरी दिल्या गेले तरी श्रेष्ठत्व मात्र ब्राम्हणांनी स्वतःच्याच अधिपत्यात ठेवले. आजही तेली, कुणबी स्वतःला महार, मांग, चांभार, भंगी, मेहतर यांच्यापेक्षा श्रेष्ठ जातीचे समजतात, तशी वागणूकही देतात. ब्राम्हणांपेक्षाही ब्राम्हणेत्तर जाती त्यांच्या पेक्षा कनिष्ठ जातींवर अन्याय-अत्याचार करतांना दिसून येतात. या देशाची मुख्य समस्या जर कोणती असेल तर ती जात आहे असे प्रतिपादित करीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जाती निर्माण होण्याची कारणे आणि त्यावरील उपाययोजना यावर Annihilation of caste आणि caste in india ही पुस्तके लिहिलीत. त्यावेळी जरी डॉ. बाबसाहेबांच्या 'जातीचा संपूर्ण नायनाट' या मताला महत्व दिल्या गेले नसले तरी डॉ. बाबासाहेबांनी केलेल्या अनेक भाकीतांपैकी हे भाकीत सुद्धा आता सत्यात उतरले आहे. 1936 ला त्यांच्या Annihilation of Caste या पुस्तकाच्या दीड हजार प्रती काही अवघ्या दिवसातच खपल्या गेल्या होत्या हे मात्र विशेष. नुकतेच अमेरिकेने भारताचे सर्वेक्षण करून भारताची मुख्य समस्या जात (caste) आहे असा अहवाल दिलाय. इतकेच नाही तर भारत कधीच विकसित राष्ट्र होणार नाही असेही या अहवालात दर्शविण्यात आले आहे.

भारतातील जातीचे आर्थिक दृष्टीकोनातून विश्लेषण करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे पहिलेच अर्थशास्त्रज्ञ होय. त्यांनी ठोसून सांगितले की, जातीव्यवस्थेत केवळ श्रमाचीच विभागणी झाली नाही तर त्यात श्रमिकांचीही विभागणी सुद्धा झाली. जगात कुठल्याही समाजात श्रमविभाजनाची अत्यंत अनैसर्गिक पंजीबद्ध करण्यात आलेल्या श्रमिकांच्या विभागणीची सांगड घातल्या गेली नाही. जातीने श्रमिकांची श्रेष्ठ-कनिष्ठ वर्गात विभागणी केल्या गेली आहे. जसे लोहाराचा मुलगा लोहाराचेच काम करेल. सुताराचा मुलगा सुताराचेच काम करेल. या कनिष्ठ जातींना आर्थिक प्रगती वाढविण्याचा दुसरा कोणताही व्यवसाय करता येणार नाही. भारतातील बहिष्कृत समाजात आपोआप आर्थिक तफावत निर्माण झाली नाही तर ब्राम्हणांकडून ती हेतुपुरस्सर करण्यात आली. आज जर बहिष्कृत समाज हा ब्राम्हण, क्षत्रीय, वैश्य यांच्यापेक्षा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आदी दृष्ट्या मागासला असेल तर याला जात जबाबदार आहे. जातीने बहिष्कृत लोकांना अपमानजनक ओळख आणि अप्रगतीयुक्त काम दिले. (insulting identity & useless work) जसे एखाद्या महाराच्या पोरात कितीही विद्वत्ता असली तरी त्याच्याकडे दुसऱ्यांचा बघण्याचा दृष्टीकोन एक महाराचे पोरच असेल. दुसरी गोष्ट त्याच्यात एका इंजिनीअरची जरी ऐपत असली तरी त्याला वर्णाश्रमाने पाडून दिलेला नाल्या साफ करण्याचाच व्यवसाय करावा लागेल. भारतीय संविधानामुळे जरी बहिष्कृत लोकांना त्यांचे मुलभूत अधिकार मिळाले असले तरी जोपर्यंत ते हिंदू धर्माच्या जातीत राहतील तोपर्यंत त्यांच्यावर अप्रत्यक्षपणे वर्णाश्रमाचेच आधिपत्य राहील. ही व्यावसायिक आणि शिक्षणिक मानसिकता हिंदू धर्मातून कधीच जाणार नाही. गांधींनी डॉ. आंबेडकर यांच्या Annihilation of caste या पुस्तकावर टीका करताना म्हटले की, जातीने दिलेले कामे करण्यात काहीही वावगे नाही. वर्णाश्रमाणे त्या त्या जातींना दिलेले काम हे ईश्वरिय सार आणि हिंदू धर्माचा पाया आहे. यावर डॉ. आंबेडकरांनी उत्तर देत म्हटले की, असे असेल तर गांधी तुम्ही तुमचा पिढीजात तराजूचा व्यवसाय निवडाऐवजी वकिलीचा व्यवसाय का निवडला. एखाद्याचा आजोबा स्त्रियांचा दलाल होता, म्हणून त्यानेही स्त्रियांचा दलालचं व्हावे असा निष्कर्ष यातून निघतो.

एक आर्थिक संस्था या दृष्टीने जात ही एक घातकी संस्था आहे. कारण तिच्यामध्ये माणसाची नैसर्गिक शक्ती आणि मनोवृत्ती सामाजिक नियमांच्या जकडीत गुदमरून जाते. जातीभेदाने श्रमाचीच विभागणी केली नाही तर तिने श्रमिकांचे वर्ग सुद्धा तयार केलेत. हे वर्ग पहिल्यावर दुसरा तर दुसऱ्यावर तिसरा याप्रमाणे जन्मजात प्रतवारी लावून देणारी संस्था आहे. दुसऱ्या कोणत्याही देशात श्रमविभाजनाला अशा तऱ्हेचा श्रमिकांचा दर्जा चिकटवून दिलेला नाही. एकप्रकारे हिंदू धर्माच्या तत्त्वज्ञानात दुसरे तिसरे काही नसून एका जातीची उत्पत्ती अत्यंत श्रेष्ठ तर दुसऱ्या जातीची उत्पत्ती निकृष्ठ असाच दाखविण्याचा प्रयत्न केला गेला आहे. अशातऱ्हेचा हिंदू समाज हा एक आदर्श समाज कधीच न ठरता तो अनेक शत्रूंचे असलेले एक विशाल घरच म्हणावे लागेल. ज्या घरातील प्रत्येक सदस्य स्वतःच्या स्वार्थी आदर्शासाठी जगतो. मोठे लहानांना तुडवीत असलेले, सशक्त अशक्तांना वरचढ होतांना, निर्दय लोक निर्भय झालेले, सद्गृहस्थ भ्याड झालेले आणि शहाण्यांना कशाचीच तमा नसलेले लोक या जातीच्या वर्गवारीमुळे हिंदू धर्मात निर्माण झालेत.



सर्व सुधारणांना गावच्या वेशीवर टांगणाऱ्या जातीने सार्वजनिक हिताची वृत्ती सुद्धा ठार मारली. इतकेच नाही तर सार्वजनिक लोकमत सुद्धा जातीने मारले. जातीने संपूर्ण हिंदू धर्माच्या बहिष्कृत लोकांचे जीवन नरकमय करून टाकले. ज्याविरुद्ध एल्गार करण्याची एकाही गुणवान हिंदू पुढाऱ्याची हिंम्मत कधी झाली नाही. माणसाला नपुसकत्व देणाऱ्या या धर्माबद्दल डॉ. बाबासाहेब म्हणतात, 'मुसलमान निर्दयी आहेत तर हिंदू नीच आहेत आणि नीचपणा निर्दयीपणापेक्षा अती वाईट आहे.'

अशा हिंदू धर्माला आकर्षित होऊन जर कुणी हिंदू धर्म स्वीकारावा अशी इच्छा व्यक्त केली तर त्याला हिंदू धर्मातील कोणती जात मिळेल? बहुतेक ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य सोडून शूद्र वर्णात त्याचे स्थान निश्चित होईल. हिंदू समाज हा केवळ जातीचा संग्रह असल्यामुळे जात ही बंद असलेली संस्था असल्यामुळे हिंदू धर्मात मुस्लीमांसारखेच धर्मांतरीत माणसाला स्थान नाही. जोपर्यंत वर्ण आणि जाती जिवंत आहेत तोपर्यंत हिंदू धर्माचे बहिष्कृत वर्ग कधीच शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात अविकसित असलेल्या गुलामीच्या बेड्या तोडू शकणार नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, 'हिंदू समाज हा एक मनोरा आहे. या मनोऱ्याला शिडी नाही. त्यातील प्रत्येक जात म्हणजे इमारतीचा एक एक मजला आहे. खालच्या जातीतील लोकांना वरच्या जातीतील मजल्यात प्रवेश नाही. खालच्या जातीतील माणूस कितीही लायक असो त्याला वरच्या जातीत जाण्याचा मार्ग नाही तर वरच्या जातीतील मनुष्य कितीही नालायक असो त्याला खालच्या जातीच्या मजल्यात लोटून देण्याची क्षमता नाही. जातीच्या पायावर तुम्ही कोणतीही इमारत उभारू शकत नाही. तुम्ही राष्ट्राची उभारणी करू शकत नाही. तुम्ही नितीमत्तेची उभारणी करू शकत नाही. जातीच्या पायावर तुम्ही जे काही बांधाल ते कोसळून पडेल आणि एकसंघ कधीच होणार नाही.

हर्षवर्धन ढोके
मो. 9421801878

जात अशी जी कधीच जात नाही. जी जन्माच्या अगोदरच ठरल्या गेली आहे आणि मनुष्याच्या मृत्यूनंतरही ती पिढ्यानपिढ्या त्याला चिकटूनच असेल. मग त्याने त्याच्या आयुष्यात कितीही प्रगाढ समाजहित कार्ये केली असली तरी त्याच्या मृत्यूनंतरही त्याला त्याच जातीने ओळखले जाईल. जो धर्मच स्वतंत्र, समता, बंधुता, न्यायावर आधारित नाही तो धर्म नसून घोड्याला आवरण्यासाठी खुट्याला बांधलेला निमुळत्या आकाराचा दोर आहे. घोडा तो दोर एका झटक्यात तोडू शकतो. पण त्याची मानसिक गुलामी त्याला त्या झटक्याने तोडणाऱ्या बलाचीही उर्जा देत नाही. अगदी तसेच हिंदू धर्माचेही आहे. ज्या जातीतून फक्त आणि फक्त गुलामीच निर्माण झाली. यावर एकमेव उपाय अशा जातीसंरचनेच्या धर्माचा त्याग करणे होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जातीच्या या अमानुष निर्मितीवर उपाय देतांनी त्यांच्या Annihilation of Caste या पुस्तकात म्हणतात, 'सर्वात पहिली आणि महत्वाची लक्षात घेण्याजोगी बाब म्हणजे हिंदू समाज ही एक भाकड कथा आहे.' जातीचे पालन करण्यात लोकांची चूक नाही. माझ्या मते जर चूक कोणती असेल तर त्यांचा धर्म. कारण त्यानेच जातींची कल्पना लोकांच्या मनावर बिंबविली आहे. हे जर खरे असेल तर ज्याच्याशी तुम्ही दोन हात करावेत असा तुमचा शत्रू जाती पाळणारे लोक नसून ज्या शास्त्रांनी लोकांना जातीधर्म शिकविला ती शास्त्रे तुमचा शत्रू होय हे उघड आहे. सहभोजनात भाग न घेणाऱ्या किंवा मिश्र विवाहास तयार न होणाऱ्या लोकांना शिव्या देऊन किंवा त्यांची टर उडवून काही फायदा होण्यासारखा नाही. तसेच प्रसंगपरत्वे सहभोजन घडविणे किंवा एखादा मिश्र विवाह समारंभ घडवून आणणे हे उपाय अपेक्षित जात नष्ट करण्याच्या ध्येयाच्या दृष्टीने निरुपयोगी ठरतात. त्यासाठी शास्त्रे पवित्र असल्याबद्दलची श्रद्धा नष्ट करणे हा त्यावरील खरा उपाय आहे. लोकांच्या मनावर अंधश्रद्धा बिंबविण्याचे व त्यांची मने घडविण्याचे शास्त्रांचे काम सुरू ठेवून तुम्ही यशाची आशा तरी कशी करू शकता? शास्त्राच्या अधिकाराला शह न देता, लोकांना शास्त्राच्या पवित्र्यावर विश्वास ठेवण्याची परवानगी देऊन केवळ लोकांना निर्दय व बुद्धिहीन म्हणणे हा समाज समाजसुधारणेचा अत्यंत भेकड असा मार्ग होय. प्रत्येक स्त्री आणि पुरुषाला शास्त्राच्या दास्यातून मुक्त करा, बुद्धाने जो पवित्र घेतला तोच तुम्हालाही घ्यावा लागेल. केवळ शास्त्रांना झुगारून तुमचा प्रश्न सुटणार नाही तर बुद्ध आणि गुरुनानकांप्रमाणे तुम्हाला त्यांचे पवित्र्यही अमान्य करावे लागेल. 'तुमच्यात जर काही घाणेरडे असेल तर तो तुमचा धर्म होय, या धर्मानेच तुमच्याच जातींच्या पवित्रपणाची भावना निर्माण केली' असे सांगण्याचे तुम्ही धाडस दाखवाल काय? म्हणूनच असा धर्म नष्ट केला पाहिजे, असे म्हणतांना मला मुळीच संकोच वाटत नाही. आणि मी तर असे म्हणतो की, असा धर्म नष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आपण कोणताही अधर्म करीत नाही. खरेच, मी असे ठासून सांगतो की, या नियमांच्या जत्थ्यांच्या संग्रहाचा मुखवटा फोडून टाकणे, धर्माच्या नावाने घातलेला बुरखा फाडून त्याचे खरे स्वरूप उघड करणे तुमचे अटळ कर्तव्य आहे. निर्भयपणे आपले मत व्यक्त करताना डॉ. आंबेडकर गांधींच्या 'हरिजन' वृत्तपत्रात डॉ. बाबासाहेबांच्या Annihilation of Caste या पुस्तकावर टीका लिहून म्हणतात, 'डॉ. आंबेडकर हे हिंदू धर्माला मिळालेले आव्हान आहे.' (Dr.Ambedkar is a challenge for Hinduism)

1936 च्या त्यांच्या जातीच्या या संशोधनावर आधारीत डॉ. बाबासाहेब 20 मे 1951 दिल्ली येथील भाषणात म्हणतात, 'जर लोक पुन्हा बौद्ध धर्माचा अंगीकार करतील तर हा देश पुन्हा वैभवाप्रत गेल्यावाचून राहणार नाही. एरव्ही दुसऱ्या कोणत्याही मार्गाने जातीभेद जाणे शक्य नाही. परंतु खरोखरच कोणाला जाती मोडायच्या असतील तर त्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार करावा. हाच एकमेव उपाय आहे.' यावर डॉ. आंबेडकर पुन्हा एक उपाय सुचवितात की, उच्चशिक्षित बुद्धिजीवी व्यक्ती हिंदू जातीत असेल आणि त्याच्या अभ्यासाने जात किती नीच आहे हे जर त्याला कळले असेल तर तो त्वरित अशा जातीला लाथाडेल. तो कधीही धर्माचा गर्व घेऊन त्या जातीत मरणार नाही. याचे उदाहरण स्वतः डॉ. भीमराव आंबेडकर आहेत. 1956 पासून हिंदू धर्माचा त्याग करून ज्यांनी बौद्ध धम्म अंगिकारला त्यांच्या जीवनात सर्वच क्षेत्रात अमुलाग्र बदल झाल्याचे दिसून आले आहे. सुधारणेच्या प्रत्येक क्षेत्रात जात आडवी येत आहे. जोपर्यंत जातीचा विनाश होत नाही. तोपर्यंत सामाजिक आणि आर्थिक समता नाही. समता नाही तर बंधुभावही नसणार. जात ही हिंदू धर्माला मिळालेली ब्राम्हणांची एक महान अमानुष देन आहे. ज्यात विनाशाशिवाय दुसरे काहीच नाही. जातीवर असा धर्म त्यागनेच हाच एकमेव उपाय जातीअंतावर आहे. याशिवाय जातीचा नाईनाट होण्याचा दुसरा अन्य कोणताही मार्ग नाही. या निष्कर्यपर्यंत मी पोहचलेलो आहे. ■ ■

---

# ज्ञानदीप प्रज्वलित करणारी वणीची बळीराजा व्याख्यानमाला

'नाचू कीर्तनाचे रंगी, ज्ञानदीप लाऊ जगी!' ही इथल्या संतपरंपरेने महाराष्ट्राला दिलेली प्रबोधनाची गाथा आहे. त्या परंपरेचा वसा आणि वारसा पुढे नेणारे कार्य मागील दहा वर्षांपासून विदर्भातील वणी येथे 'बळीराजा व्याख्यानमाला' करीत आहे. विवेकी विचारांचा दीप तेवत ठेवत, अंधश्रद्धा आणि भीतीने ग्रस्त समाजात ज्ञानाचा प्रकाश पसरवत.

**विचारांची संस्कृती, समाजाचा आत्मा :-** मनुष्य हा विचारशील प्राणी आहे. विचार हे मानवी जीवनाचे सौंदर्य आहेत. अश्मयुगापासून एआयच्या युगापर्यंत झालेली वैज्ञानिक प्रगती हे कुणाच्यातरी विचारांचे फलित आहे. म्हणूनच गुहेत राहणारा माणूस आज चंद्रावर पोहोचला. समाजाचे सुदृढपण केवळ विचारात असते. विवेक, सत्यशोधकता आणि प्रामाणिक चिंतन यातच समाजाचे पोषण दडलेले आहे.

**वणीचा वैचारिक वारसा :-** बळीराजा व्याख्यानमाला वणी परिसरातील नागरिकांसाठी गेल्या दशकभरापासून विचारांची मांदियाळी ठरत आहे. साहित्य आणि संस्कृतीचा वारसा लाभलेला हा प्रदेश पूर्वी वर्धा-पैनगंगेच्या सुपीक खोऱ्याने समृद्ध होता. याच भूमीत गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि कैकाडी महाराज यांचे कीर्तन ऐकलेली पिढी आजही जिवंत आहे. या भूमीतून अनेक साहित्यिकांनी मराठी साहित्यक्षेत्र समृद्ध केले. कॉ. नामदेवराव काळे, दौलतराव शेंडे, कवी कृष्णा लाडसे, म. ता. राजुरकर, प्राचार्य राम शेवाळकर, संत बाजीराव महाराज, कवी गौतम सुत्रावे, संपादक रामकृष्ण तेलंग, डॉ. अनिस अहमद, बाळासाहेब सरपटवार, सुभाष उसेवार, प्रा. प्रभाकर पावडे, कवी लक्ष्मीकांत घुमे, दशरथ मडावी, पुष्पाताई आत्राम इत्यादींचा या परंपरेत मोलाचा वाटा आहे. त्यामुळेच वणीला'विदर्भाची सांस्कृतिक राजधानी' म्हटले जाते.

**कोळशाच्या सावटाखालील समृद्ध भूमी :-** ऐंशी-नव्वदच्या दशकात कपाशीने भरलेल्या बैलगाड्या जेव्हा तेलंगणातील बाजाराकडे निघत, तेव्हा तो काळ वणीच्या समृद्ध कृषिसंस्कृतीचा होता. पण कोळसा खाणींच्या आक्रमणानंतर ही मातीमाय उद्ध्वस्त झाली. सुपीक भूमीचे उत्खनन होऊन काळ्या



धुराच्या ढिगाऱ्यांनी तिची जागा घेतली. आज हा प्रदेश 'ब्लॅक डायमंड सिटी' म्हणून ओळखला जातो; पण इथला डायमंड कुणी नेला हे माहीत नाही. मात्र, कोळशाची काजळी इथल्या भूमिपुत्रांच्या श्वासात घर करून बसली आहे.

**विचारांचा दीप पुन्हा पेटवत :-** या स्थितीतही नामदेवराव काळे यांनी पेरलेल्या कम्युनिस्ट विचारधारेच्या बळावर आणि विवेकवादी चळवळींच्या माध्यमातून इथला भूमिपुत्र अन्यायाविरुद्ध लढत राहिला. परंतु आजची वास्तवता भयावह आहे. स्वातंत्र्याला अठ्ठ्याहत्तर वर्षं पूर्ण होत असताना लोकशाहीची उंची खुजी होत चालली आहे. भयाला सलाम करणाऱ्यांची संख्या वाढते आहे. विचारांवर गदा येत आहे. अशा परिस्थितीत 'बळीराजा व्याख्यानमाला' विवेक आणि मानवतेचा दीप पेटवत आहे.

**प्रबोधनाचा दशकभराचा प्रवास :-** या व्याख्यानमालेचा आरंभ 2015 मध्ये 'शिव, फुले, शाहू, आंबेडकर' यांच्या विचारांच्या प्रेरणेने 'शिव महोत्सव समिती, वणी' यांनी केला.पहिल्या व्याख्यानमालेचे पुष्प प्रखर विचारवंत गंगाधर बनबरे यांनी गुंफले. त्यानंतर विजय जावंधिया, कॉ. स्मिता पानसरे, डॉ. मंजुश्री पवार, उत्तम कांबळे, चंद्रकांत वानखेडे, प्रा. डॉ. साहेब खंदारे, प्रा. डॉ. प्रल्हाद लुलेकर, ज्ञानेश महाराव आणि प्रा. डॉ. रंगनाथ पठारे अशा ख्यातनाम वक्त्यांनी समाजजागृतीचे विचारप्रकाश फुलवले. शेती, संस्कृती, लोकशाही, तंत्रज्ञान, भाषा, अंधश्रद्धा, इतिहास, मानवमूल्ये, शिक्षण अशा विविध विषयांवर या व्याख्यानमालेत विचारांचा सडा पडला आहे.

**बहुजन समाजाचा जिद्दीचा प्रवास :-** ब्राम्हण्येतर समाजाने एकत्र येऊन असा वैचारिक उत्सव दहा वर्षे टिकवणे ही सोपी गोष्ट नाही. समाजातील अंतर्गत मतभेद, व्यवस्थेचे कपटी डाव. या सगळ्यांवर मात करूनही ही व्याख्यानमाला आज अकराव्या वर्षात प्रवेश करते आहे.

**अकरावे वर्ष :- नव्या विचारांचा शंखनाद :-** या वर्षी 11 व 12 ऑक्टोबर 2025 रोजी होणाऱ्या व्याख्यानमालेत देशातील प्रख्यात कायदा तज्ज्ञ, मानवाधिकार कार्यकर्ते ॲड. असीम सरोदे मुख्य वक्ते म्हणून येत आहेत. व्याख्यानमालेचे वैशिष्ट्य म्हणजे एका वक्त्याला दोन दिवस व दोन विषय दिले जातात. त्यामुळे श्रोत्यांना सखोल, भावनिक आणि विचारस्पर्शी प्रवास अनुभवायला मिळतो.

संजय मादेवार

**विचारांचा सण, लोकांचा उत्सव :-** दसरा-दिवाळीच्या काळात वणीतील बाजोरिया लॉन येथे हा वैचारिक उत्सव भरतो. अनेक कार्यकर्ते जणू स्वतःच्या घरचा सोहळा असल्याप्रमाणे झटतात, तर सहृदयी देणगीदार या चळवळीला आर्थिक बळ देतात.ज्ञान, विवेक आणि मानवतेची ज्योत जिवंत ठेवणाऱ्या या बळीराजा व्याख्यानमालेचा प्रवाह असाच अखंड वाहत राहो!

'विचारचं हे शेत - जपायचे, पेरायचे, वाढवायचे!' ■ ■

---

# न्यायव्यवस्थेच्या विकासाची नवीन सुरुवात

**देशातील नागरिकांना राजकीय अधिकार देण्यासोबतच सामाजिक आणि आर्थिक समानता देण्याची गरज भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी व्यक्त केली होती. आजच्या काळात ही समानता निर्माण करणे ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी असल्याचे प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी केले.**

**भारताचे सरन्यायाधीश भूषण गवई यांचे हस्ते नाशिकच्या न्यायालयाचे भव्य उद्घाटन**

न्यायव्यवस्थेच्या मजबुतीकरणासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून नाशिक जिल्हा न्यायालयाची सात मजली आधुनिक इमारत शनिवार, 27 सप्टेंबर 2025 रोजी भारताचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या हस्ते उद्घाटित झाली. हे उद्घाटन शरणपुर रोडवरील पुलिस परेड मैदानावर सकाळी 9.30 वाजता पार पडले. या भव्य समारंभात कार्यक्रमाला मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती श्री. चंद्रशेखर, न्या. रेवती डेरे मोहिते, न्या. एम. एन. सोनम, न्या. आर. व्ही. घुगे, न्या. ए. एस. गडकरी, न्या. मकरंद कर्णिक, न्या. सारंग कोतवाल, न्या. जितेंद्र जैन, न्या. अश्विन भोबे, अतिरिक्त सॉलिसिटर जनरल ऑफ इंडिया अनिल सिंग, राज्याचे महाधिवक्ता बिरेंद्र सराफ, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीचंद जगमलानी, महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलचे अध्यक्ष अमोल सावंत, नाशिक वकील संघाचे अध्यक्ष ॲड. नितीन ठाकरे, महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलचे सदस्य जयंत जायभावे, ॲड. अविनाश भिडे यांचेसह बार कौन्सिल व वकिल संघाचे पदाधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमास अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, क्रीडा मंत्री माणिकराव कोकाटे, खासदार राजाभाऊ वाजे, आमदार सीमा हिरे, सरोज अहिरे, हिरामण खोसकर, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, विशेष पोलीस महानिरिक्षक दत्तात्रय कराळे, पोलीस आयुक्त संदिप कर्णिक, जिल्हाधिकारी जलज शर्मा, महापालिका आयुक्त मनीषा खत्री, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार माजी न्यायाधीश अनील वैद्य, मनोविकास समाजकार्य अधीक्षक प्रवीण गांगुर्डे, ॲड. बाबासाहेब ननावरे यांच्या प्रमुख उपस्थितीसह अनेक मान्यवरांचा सहभाग होता, वकिल संघाचे प्रतिनिधी, न्यायालयीन अधिकारी, कर्मचारी, वकिल व त्यांचे कुटूंबिय मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी या इमारतीच्या आवारात सर्वोच्च न्यायालयाच्या धर्तीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा बसाविण्यात यावा अशी मागणी वकील संघाच्या वतीने करण्यात आली.

नाशिक बार असोसिएशनच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाने शहराच्या न्यायिक इतिहासात एक सुवर्ण अध्याय जोडला असून, या इमारतीमुळे जिल्ह्यातील न्यायप्रशासन अधिक कार्यक्षम आणि पारदर्शक होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. सरन्यायाधीश श्री. गवई म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 25 नोव्हेंबर 1949 रोजीच्या भाषणात एक व्यक्ती, एक मत या आधारावर राजकीय समानता निर्माण केल्याचे म्हटले होते. मात्र, सामाजिक आणि आर्थिक लोकशाही निर्माण झाली तरच या लोकशाहीला अर्थ असेल, असे मत त्यांनी व्यक्त केले होते. स्वातंत्र्याबरोबरच समानता हवी, यासाठी त्यांचा आग्रह होता. आजच्या काळातही हे तंतोतंत लागू पडते. बंधुत्व आणि बंधुभाव हे दोन्ही आवश्यक असून सामाजिक आणि आर्थिक समानतेकडे वाटचाल करण्याची आपली सर्वांची जबाबदारी आहे. आपल्या राज्यघटनेचा प्रवास अधिक





सकारात्मक दिशेने झाला आहे. जमीन कमाल धारणा कायदा, कूळ कायदा, मजुरांच्या अधिकारांविषयी राज्यघटनेत समाविष्ट केलेल्या तरतूदी, राज्य धोरणाची निर्देशक तत्वे, मूलभूत हक्क आणि दायीत्व आदींबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्याकाळी राज्यघटनेत समाविष्ट केलेल्या बाबी आजही तितक्याच महत्वाच्या ठरत असल्याने त्यांचे महत्व लक्षात येते, असे गवई म्हणाले.

**इमारतीची भव्यता आणि वैशिष्ट्ये :-** नाशिक जिल्हा न्यायालयाची ही नवीन इमारत केवळ एक वास्तूच नसून, न्यायव्यवस्थेच्या आधुनिकीकरणाचे प्रतीक आहे. सुमारे 310 कोटी रुपयांच्या खर्चाने चार वर्षांच्या कालावधीत पूर्ण झालेली ही सात मजली इमारत महाराष्ट्रातील सर्वात देखणी आणि आधुनिक न्यायालयीन वास्तू ठरणार आहे. इमारतीचे डिझाइन पारंपरिक भारतीय वास्तुकलेच्या प्रेरणेने तयार करण्यात आले असून, त्यात आधुनिक सुविधांचा समावेश आहे. इमारतीच्या बाह्य रचनेत श्वेत रंगाची प्रमुखता असून, लाल रंगाच्या छताची आणि वक्राकार खिडक्यांची रचना तिला एक भव्य लुक देते. इमारतीच्या परिसरात हिरवळीचे मोठे उद्यान, वाहनतळ आणि सुरक्षा व्यवस्था यांचा समावेश आहे. या इमारतीत 140 न्यायालयीन कक्ष असतील, ज्यात जिल्हा व सत्र न्यायालयांसह विविध विभागांचे कार्यालये समाविष्ट आहेत.



प्रवीण गांगुर्डे
मनसोपचारतज्ञ

प्रत्येक कक्षात डिजिटल रेकॉर्डिंग सिस्टम, व्हिडिओ कॉन्फरन्सिंग सुविधा आणि ई-कोर्ट सेटअप उपलब्ध असेल. इमारतीत न्यायाधीशांसाठी स्वतंत्र चेंबर्स, वकीलांसाठी वेटिंग लाउंज, लायब्ररी आणि कॅन्टीन यांसारख्या सुविधा आहेत. विशेष म्हणजे, इमारत पर्यावरणस्नेही असून, सौरऊर्जेवर चालणारी लिफ्ट्स आणि रेनवॉटर हार्वेस्टिंग सिस्टम यांचा वापर करण्यात आला आहे. या इमारतीमुळे नाशिकमधील न्यायप्रक्रिया वेगवान होईल आणि नागरिकांना न्याय मिळवणे सोपे होईल, असे नाशिक बार असोसिएशनचे पदाधिकारी म्हणाले. उद्घाटन समारंभादरम्यान, इमारतीच्या वाहनतळासाठी भूमिपूजनही करण्यात आले. हे भूमिपूजनही भूषण गवई यांच्या हस्ते पार पडले, ज्यामुळे न्यायालय परिसरातील पायाभूत सुविधा आणखी मजबूत होणार आहेत. गवई यांचे न्यायदान हे सामाजिक न्याय, घटनात्मक मूल्ये आणि नागरिकांच्या हक्कांसाठी ओळखले जाते. त्यांनी अनुसूचित जाती आणि मागासवर्गीयांच्या हक्कांसंबंधीचे अनेक महत्त्वपूर्ण निकाल दिले असून, न्यायव्यवस्थेत तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यावर त्यांचा भर आहे. नाशिकच्या उद्घाटनावेळी बोलताना गवई म्हणाले, 'न्यायव्यवस्था ही लोकशाहीचा आत्मा आहे. या आधुनिक इमारतीमुळे नाशिकमधील न्यायप्रक्रिया अधिक सुलभ आणि न्याय्य होईल. आम्ही ई-कोर्ट आणि डिजिटलायझेशनवर भर देऊन न्याय मिळवण्याचा कालावधी कमी करू इच्छितो.' त्यांच्या या शब्दांनी उपस्थित सर्वांचे दाद मिळवल्या.

**कार्यक्रमाची भव्यता आणि उपस्थिती :-** उद्घाटन समारंभ अत्यंत भव्य पद्धतीने साजरा करण्यात आला.

नाशिक बार असोसिएशनने गवई यांचे स्वागत करण्यासाठी विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

**न्यायव्यवस्थेला नवे बळ :-** या इमारतीमुळे नाशिक जिल्ह्यातील 140 हून अधिक न्यायालयीन कक्षांची गरज भागेल आणि प्रलंबित खटल्यांची संख्या कमी होईल. विशेषतः ग्रामीण भागातील नागरिकांना न्याय मिळवणे सोपे होईल. नाशिक बार असोसिएशनने या इमारतीला 'महाराष्ट्रातील न्यायालयीन इमारतीत आदर्श' असे संबोधले असून, भविष्यातील न्यायिक विकासासाठी हे एक मीलाचे दगमगणार असल्याचे सांगितले. एकूणच, भूषण गवई यांच्या हस्ते झालेल्या या उद्घाटनाने नाशिकच्या न्यायव्यवस्थेला नवे आयाम प्राप्त झाले असून, हे घटनात्मक मूल्यांच्या संरक्षणासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. ■ ■




## कुशीनारा बुद्ध विहार

कुशीनगर जरीपटका नागपूर, बुद्ध विहार लोकवर्गणीतून निर्माण करण्यात आले आहे. विहारात तथागत बुद्धांची मूर्ती असून शेजारी प.पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा विराजमान आहे. विहारात महिला मंडळाद्वारे दररोज सकाळ-संध्याकाळ वंदना, प्रत्येक पौर्णिमेला भिक्खू धम्म प्रवचनासाठी असतात. धम्मचक्र प्रवर्तन दिन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, बौद्ध पौर्णिमा, म. फुले, शाहू महाराज व धम्मसंगोष्टीचे आयोजन महिला मंडळाच्या सदस्यांकरीत असतात. छाया थोरात, माधुरी डोंगरे, वनिता नंदेश्वर, पंचशीला गजभिये, मनोरमा गजभिये, नंदिनी नंदेश्वर, मीना बागडे, चंद्रकला रामटेके, कांता सुखदेवे, मंजुश्री मेश्राम, अस्मिता गोसावी, पौर्णिमा रामटेके, आशा वाळके, मंजुषा अलोणे, यशोधरा मेश्राम, रेखा नागदेवे, प्रेमलता नंदेश्वर, वाहणे, मडके, वानखेडे, रत्ना चौरे, टिपले, वत्सला नारनवरे व उत्कर्षा भगत सक्रिय आहेत.

संवाद मित्र, चित्तरंजन चौरे
मो.9422906264.

# कांशीराम राजकारण टिकले असते तर लोकशाही, संविधान धोक्यात आले नसते : ॲड. डॉ. सुरेश माने

**नागपूर :** कांशीरामजी यांनी सहा हजार जातीत विभागलेल्या बहुजन समाजाला जागृत आणि संघटित करून बहुजन मतांच्या आधारावर सत्ताधारी बनून आपला उध्दार करण्याचे स्वप्न बहुजन समाजाला दाखवून त्यादिशेने त्यांनी राजकारण केले. हे राजकारण टिकले असते तर देशात लोकशाही, संविधान धोक्यात आले नसते आणि भगव्या वादळाची दहशत निर्माण झाली नसती, असे ठाम प्रतिपादन बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. डॉ. सुरेश माने यांनी केले. ते दक्षिण नागपूरमध्ये चंद्रमणी नगर येथे बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टी तर्फे बहुजन नायक कांशीरामजी यांचा 19 वा स्मृतिदिन व बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीचा 10 वा स्थापनादिनानिमित्त आणि नागपूर जिल्हा स्तरीय जाहीर सभेत बोलत होते. पुढे ते म्हणाले की, कांशीरामजी यांच्या निर्वाणानंतर बहुजन चळवळीत एक मोठी पोकळी निर्माण झाली आणि चळवळ खिळखिळी व्हायला लागली. म्हणून आम्ही पुन्हा कांशीराम प्रणीत राजकीय, सामाजिक चळवळ गतिमान करण्यासाठी 9 ऑक्टोबर 2015 बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीची स्थापना करून गत दहा वर्षात कांशीरामजींना अभिप्रेत, त्यांनी आखून दिलेल्या दिशानिर्देशानुसार सामाजिक, राजकीय चळवळ गतिमान करण्यासाठी बहुजन समाजाला जागृत व संघटित करण्यासाठी, बहुजन समाजाच्या ज्वलंत प्रश्नांवर सातत्याने संघर्ष करून कार्यक्रमाचा झंझावात सुरू आहे. याप्रसंगी पक्षाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष रमेश पाटील म्हणाले की, 1965 ते 2003 पर्यंत कांशीराम यांनी देशात मिशनरी कार्यकर्ते निर्माण करून स्वाभिमानी मिशनरी राजकारणाला गती दिली. फुले-शाहू-आंबेडकरांच्या विचारांवर आमदार-खासदार निवडून येऊ शकतात हे दाखवून दिले.



सरकार बनवून ते चालवूनही दाखवले. पण त्यांच्या निर्वाणानंतर जी पोकळी निर्माण झाली ती भरून काढण्यासाठी ॲड. डॉ. सुरेश माने यांच्या नेतृत्वात बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टी देशात फुले-आंबेडकरी चळवळ गतिमान करण्यासाठी 9 ऑक्टोबर 2015 पासून गेली दहा वर्षे अथक परिश्रमाने चळवळ गतिमान करणे सुरू आहे. याप्रसंगी ॲड. भुपेंद्र रायपुरे, संजय बोधे, विश्रांती झांबरे, शांताराम जळते, डॉ. विनोद रंगारी यांचीही भाषणे झाली. कार्यक्रमाचे संचालन जिल्हा प्रभारी गुलचंद रंगारी यांनी केले तर दक्षिण नागपूरचे अध्यक्ष संतोष ठवरे यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुनंदा गायकवाड, किशोर सोमकुवर, अनिल गरडकर, रेखा मेश्राम, यशोधरा नानवटे, माया मेश्राम, एस. टी. पाझारे, चंद्रभान मेश्राम, वासुदेव मेश्राम, सी. टी. बोरकर, वंदना लांजेवार, जयश्री आदिकर, जयश्री अहिरे, मनोरंजन फुलझेले इत्यादी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## महत्वाचे

### अण्णाभाऊ साठे साहित्य संमेलन 11 ऑक्टोबरला नागपूरात

**नागपूर :** साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे साहित्य संमेलनाचे आयोजन येत्या शनिवार, दि. 11 ऑक्टोबर 2025 रोजी नागपूरात करण्यात आले आहे. हे संमेलन अण्णाभाऊ साठे प्रशिक्षण व संशोधन संस्था, मुंबई, नागपूर महानगरपालिका, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित होत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कन्व्हेन्शन सेंटर, इंदोरा येथे सकाळी 8:30 ते सायं. 6:30 या वेळेत होणाऱ्या या एकदिवसीय संमेलनात अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचा जागर, ग्रंथ दिंडी, उद्घाटन सोहळा, प्रदर्शनी, सामाजिक प्रबोधन कार्यक्रम तसेच त्यांच्या जीवनावर आधारित नृत्य-कला-संगीत सादरीकरण होणार आहे. विविध सामाजिक संस्था आणि नामांकित व्यक्तींचा सत्कारही या वेळी होणार आहे.

### रविवारी कठीण चिवर दान समारोह



**नागपूर :** पावन वर्षावास निमित्त परम पूज्य धम्मपाल यांच्या उपस्थितीत 'सम्यक दृष्टि मन-शुद्धि सत्र व कठीण चिवर दान समारोह' दि. 12 ऑक्टोबर 2025, रविवार सकाळी 10 वाजता आदर्श कन्या शाळा, बेझनबाग येथे होणार आहे. सहभागी उपासक-उपासिकांनी त्रश्शद्द्यद्ग स्त्रश्शद्ध भरून नोंदणी करावी. संपर्क - कॅप्टन श्रीकांत गोंडाने - 9819810826.

### मैत्री बुद्ध विहार रामबाग येथे वर्षावास समाप्ती



**नागपूर :** मैत्री बुद्ध विहार उपासक-उपासिका संघ रामबाग, नागपूर येथे भंदत प्रज्ञानंद स्थविर यांचा वर्षावास आषाढ पौर्णिमापासून ते अश्विन पौर्णिमापर्यंत 3 महिने वर्षावास कालावधीत मैत्री बुद्ध विहारात बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथाचे वाचन भंदत प्रज्ञानंद स्थविर यांनी केले, उपासक-उपासिका दररोज सकाळी व संध्याकाळी बुद्ध विहारात वर्षावासात पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करून पंचशील, अष्टशील उपोसत शीलाचे पालन केले, प्रमुख अतिथी म्हणून बौद्धाचार्य, भगवान कांबळे, हे या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होते, तसेच उपासक-उपासिका यांची उपस्थिती होती, फुलचंद गवळी, राजेंद्र सोनटक्के, विक्की वानखेडे, नरेश ढोले, प्रकाश गायधने, जागेश्वर पाटील, सोनु उमरे, मोनिका वाघमारे, शारदा रंगारी, इंदु गजभिये, सुनंदा वाघमारे, इत्यादी मोठ्या प्रमाणात वर्षावास समाप्ती कार्यक्रमात उपासक-उपासिका उपस्थित होते.

### डॉ. मोनाली पोफरे यांचा येव्होआ येरे फाउंडेशन तर्फे सत्कार



**नागपूर :** येव्होआ येरे फाउंडेशनचा वर्धापन दिनाचा कार्यक्रम नुकताच वनामती संस्थेच्या सभागृहात आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात येव्होआ येरे फाउंडेशनचे संचालक डॉ. रमेश बोरकुटे, तसेच आयुर्वेदिक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चौधरी यांच्या हस्ते डॉ. मोनाली पोफरे यांना उत्कृष्ट प्राध्यापक तसेच साहित्य क्षेत्रात उत्कृष्ट लेखन केल्याबद्दल सन्मानचिन्ह आणि स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यांचा महाराष्ट्र ऑफिसर्स फोरमचे महासचिव सच्चिदानंद दारूंडे, माजी तहसीलदार दामोदर चालखुरे, प्रा. अभय वराडे, डॉ. शिल्पा वराडे सम्यक बहुउद्देशीय संस्थेच्या सचिव, स्नेहा दारुंडे, माजी जिल्हाधिकारी माणिक साखरे, गौतमी महिला महामंडळाच्या आशा मेश्राम, रेखा साखरे, लक्ष्मण बोरकर, माजी शिक्षण संचालक चंद्रमणी बोरकर इत्यादींनी मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.

### आचार्य चाणक्य आयटीआय मध्ये अल्पमुदतिचे अभ्यासक्रमाचे उद्घाटन

**नागपूर :** आचार्य चाणक्य शासकीय उच्चस्तर औद्योगिक प्रशिक्षण संस्था, इंदोरा नागपूर ढ्ढञ्ज्ञढ्ढ मध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते अल्पमुदतीचे अभ्यासक्रमाचे ऑनलाइन उद्घाटन झाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रमुख उपस्थितीत उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उप मुख्यमंत्री अजित पवार उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष आमदार नितीन राऊत होते. या उपरोक्त संस्थामध्ये Digital Mitra, Assistant Electrician, CCTV Installation Technician, Web Developer व स्त्रelf Employed Tailor हे अल्प मुदतीचे अभ्यासक्रम सुरू होणार आहे. कार्यक्रमाला ढ्ढस्ष्ट चे अध्यक्ष व सदस्य उपस्थित होते. असे या संस्थेचे प्राचार्य के.एन. सोनपिपरे यांनी कळविले आहे.

## सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर बूट भिरकावऱ्याला शिक्षा मिळावी : मागणी



**नागपूर :** देशाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर सर्वोच्च न्यायालयाच्या परिसरात ॲड. राकेश किशोर तिवारी यांनी केलेल्या भ्याड हल्ल्याची कसून चौकशी व्हावी आणि आरोपीला त्याने केलेल्या गुन्ह्याची शिक्षा मिळावी, याकरिता नागपूर जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन देण्यासाठी, पुरोगामी प्रबोधन चळवळीचे अध्यक्ष रवी हाडे, कोषाध्यक्ष रंगराज गोस्वामी, विहार संवाद समितीच्या विदर्भ अध्यक्षा ज्योत्स्ना बनसोड, विहार संवाद समितीच्या जिल्हाध्यक्ष शिल्पा मकेश्वर आदी गेले असता, प्रत्यक्षात जिल्हाधिकारी यांनी सुद्धा हा हल्ला अत्यंत निंदनीय आहे असे म्हणून, या भ्याड हल्ल्याचे निषेध केले. काळ बदलला तरी विचारसरणी अजूनही बदललेली नाही. ज्या मनुवादी लोकांनी सरन्यायाधीश बी. आर. गवई यांच्यावर बूट भिरकावला, त्याच मनुवादी लोकांनी सावित्रीबाई फुले यांच्या अंगावर सुद्धा चिखल, दगड, शेण फेकले. मनुवादी विकृती असलेल्या विचारसरणीला आळा घालण्यासाठी, न्यायालय कुठलाही भेदभाव न करता, योग्य न्याय-निवाडा करेल आणि अशी कृत्य करणाऱ्या आरोपीला कठोर कार्यवाही करावी, यासाठी पुरोगामी प्रबोधन चळवळीद्वारे निवेदन दिले.

## 'अंनिस'चे दिवाळीला 'फटाके नको, पुस्तके घ्या' अभियान

### ना नफा-ना तोटा तत्त्वावर पुस्तकांची होणार विक्री

**नागपूर :** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्यावतीने दरवर्षी 'फटाकेमुक्त दिवाळी' हा पर्यावरणपूरक उपक्रम राबविला जातो. यंदाच्या दिवाळीनिमित्त अंनिसकडून 'फटाके नको, पुस्तके घ्या' अभियान राबवले जात आहे. यासाठी विविध शाळांमधून 6 ते 16 वयोगटातील मुलांसाठी अंनिसकडून पुस्तके घेण्याबाबत प्रबोधन करण्यात येत आहे. तसेच अंनिसकडून प्रकाशित करण्यात आलेली पुस्तके ना नफा-ना तोटा तत्त्वावर विक्री केली जात आहेत. फटाक्यांना खर्च होणारी रक्कम टाळून ती पुस्तके खरेदी करण्यासाठी मुलांनी वापरावी, यासाठी 'फटाके नको, पुस्तके घ्या' उपक्रम अंनिसकडून राबविला जात आहे. यासाठी विविध शाळांमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे तसेच मुख्याध्यापक, शिक्षकांनाही याबाबतीत पुढाकार घेण्यासाठी प्रवृत्त केले जात आहे. ही पुस्तके ना नफा-ना तोटा तत्त्वावर विद्यार्थ्यांसाठी रु. 50 ला एक पुस्तक याप्रमाणे विक्री केली जात. ही पुस्तके घेण्याबरोबर यंदा दिवाळी फटाकेमुक्त, प्रदूषणमुक्त साजरी करावी तसेच फटाक्यांवर होणारा खर्च टाळून पुस्तके खरेदी करावी, असे आवाहन 'अंनिस'चे कार्यकर्ते रामभाऊ डोंगरे, चित्तरंजन चौरे, विजया श्रीखंडे, इंजी. गौतम पाटील, प्रा. सुनील भगत, देवानंद बडगे, मंगला गाणार, विजया ठाकरे, डॉ. विकास होले, प्रा. पुष्पा घोडके, वर्षा सहारे, सुषमा शेवडे, इंदू उमरे, गंगा खांडेकर, वर्षा टेंभेकर, विजय सुरवाडे, चंद्रशेखर मेश्राम, शारदा मोटघरे यांनी केले आहे.




## काष्ट्राईब महासंघाचा वर्धापन दिन व कवी संमेलन आज

**नागपूर :** काष्ट्राईब महासंघाच्या स्थापनेला आज 50 वर्षे पूर्ण होत असून, त्यानिमित्ताने वर्धापन दिन, सत्कार समारंभ व कवी संमेलन आयोजित करण्यात आले आहे. कार्यक्रम आज शनिवार, दि. 11 ऑक्टोबर 2025 रोजी दुपारी 12.30 वाजता दै. बहुजन सौरभ कार्यालय, अजनी पोलीस स्टेशन रोड, नागपूर येथे होणार आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष अरुण गाडे, अध्यक्ष काष्ट्राईब महासंघ असतील. उद्घाटन हरीश उईके, अध्यक्ष गोंडवाना गणतंत्र पक्ष यांच्या हस्ते होणार आहे. या वेळी विशेष अतिथी अनिरुद्ध शेवाळे, जनार्दन मुन, सुग्रीवप्रसाद साहनी, प्रमुख अतिथी म्हणून प्रा. जावेद पाशा, प्रा. रमेश पिशे, प्रा. मधुकर उईके, प्रा. राहुल मुन, प्रा. संध्या राजूरकर, मीना भागवतकर, प्रतीक पटले, किशोर बिरला आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक पुरस्कार या प्रसंगी प्रसिद्ध नाटककार व ज्येष्ठ कवी शालिक जिल्हेकर आणि ज्येष्ठ कवी हृदय चक्रधर यांना प्रदान करण्यात येणार आहे.

कवी संमेलनाचे अध्यक्ष गोविंद वाघमारे असून, अतिथी कवी म्हणून हृदय चक्रधर, डॉ. अजय चिकाटे, नाना शेंडे, शालिक जिल्हेकर, खेमराज भोयर आदींचा सहभाग असेल. संचालन प्रभु फुलझेले व लीलाधर गायकवाड करणार आहेत. कार्यक्रमाचे आयोजन सिताराम राठोड, राजन मेश्राम, रवि पोथारे, राजेश ढेंगरे, कैलास खोंडे, अरविंद पाटील, अहिंसक लखोटे, कमलेश मेश्राम यांनी केले असून सर्वांना उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## प्रज्ञाशिल बुद्ध विहार, प्रज्ञानगर येथे, 69 वा धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा



**नागपूर :** 69 वा धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमास मुख्य अतिथी डॉ. एस. पी. आवळे सेवानिवृत्त शासकीय अधिकारी, मुख्य मार्गदर्शक रत्नघोष सोनपिंपळे सेवानिवृत्त गटशिक्षणाधिकारी व धम्म प्रचारक तसेच प्रज्ञा शिल बुद्धविहार समितीचे अध्यक्ष सिद्धार्थ मानकर, सचिव जालेंद्र मेश्राम उपस्थित होते. मुख्य अतिथी डॉ. एस. पी. आवळे म्हणाले की, प्रत्येकाने स्वयं प्रकाशित झाले पाहिजे. आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडले पाहिजे. प्रमुख मार्गदर्शक रत्नघोष सोनपिंपळे म्हणाले की, बौद्ध धम्म हा आचरणात आणावयाचा धम्म आहे. मानव कल्याणाच्या धम्म आहे. प्रत्येकाने पंचशील/अष्टांग मार्ग आपल्या आचरणात आणावयाचा कसोशीने प्रयत्न केला पाहिजे. त्याचे अनुसरण केल्यास प्रत्येक व्यक्ती सुखी झाल्याशिवाय राहणार नाही. या सर्व बाबींचा अभ्यास करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समता, स्वातंत्र्य, बंधुभाव तथा नैतिकता यावर आधारित असलेला बौद्ध धम्माचा स्वीकार केला आणि 14 ऑक्टोबर 1956 ला अशोक विजयादशमी दिनी महास्थवीर चंद्रमणी यांच्या हस्ते बौद्ध धम्माची दिक्षा घेतली आणि स्वतः पाच लाख लोकांना नागपूर येथे दिक्षा दिली. ही जगातील अभूतपूर्व घटना आहे. शेवटी प्रज्ञा शिल बुद्ध विहार समितीतर्फे डॉ. एस. पी. आवळे व महेंद्र डोंगरे यांचा सेवानिवृत्ती निमित्ताने शाल पुस्तक व बुके तसेच पुढील हालचालीस हार्दिक शुभकामना देऊन सत्कार करण्यात आला.

कल्पना सोनपिंपळे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर सुंदर असे गौरव गीत गाईले. कार्यक्रमाचे संचालन जालेंद्र मेश्राम यांनी केले व आभार प्रदर्शन लता खडसे यांनी केले.

## जीवन साफल्याची संजीवनी म्हणजे प्रार्थना : नामदेव गव्हाळे



**गुरुकुंज मोझरी :** राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांच्या 57व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित ग्रामगीता तत्त्वज्ञान आचार महायज्ञ व पालखी पदयात्रा शिबिर महोत्सवात आजच्या सामुदायिक प्रार्थनेनी सुरुवात झाली आहे. सामुदायिक प्रार्थना ही माणसाला शुद्ध करण्याची साधना आहे. ती फक्त ईश्वराच्या स्मरणासाठी नसून, मन, बुद्धी आणि आचरण शुद्ध करण्याचा एक सामूहिक प्रयत्न आहे. ईश्वरभक्ती म्हणजे फक्त शब्दांनी केलेली स्तुती नव्हे, तर समाजासाठी प्रेम, सेवा आणि करुणा यांचा आचरणात उतरलेला भाव होय. प्रार्थना माणसाला शिकवते की, आपण सगळे एकाच सृष्टीचे घटक आहोत. भेदभाव, अहंकार आणि स्वार्थाच्या पलीकडे जाऊन प्रत्येकात परमेश्वर पाहण्याची भावना हीच खरी प्रार्थना आहे. जीवन साफल्याची संजीवनी म्हणजे प्रार्थना होय असे मार्गदर्शन नामदेवराव गव्हाळे यांनी केले.

त्यापूर्वी भु-वैकुंठ आत्माअनुसंधान अड्याळ टेकडी इथून हजारो गुरुदेव भक्तांच्यासोबत पालखी गुरुकुल मध्ये पोहोचली.

तसेच दि.10 ऑक्टोबरला होणारे कार्यक्रम सामुदायिक ध्यान या विषयावर सुबोध दादा यांचे मार्गदर्शन, योग प्राणायाम, सेवा साधना, ग्राम आरोग्य, राष्ट्रीय कीर्तन, युवक संमेलन, महिला संमेलन, सप्तखंजेरी प्रबोधन, शेतीमाती कवी संमेलन सुप्रसिद्ध कवी मंगेश वानखेडे, विठ्ठल कुलट त्यानंतर सप्तकखंजेरी समाजप्रबोधन होईल. ज्यामध्ये प्रामुख्याने समाज प्रबोधनकार इंजि. भाऊसाहेब थुटे समारोप करतील.

## महामानवांचे व्यसनमुक्तीपर विचार पुस्तिकेचे पुन:प्रकाशन



**नागपूर :** 69 व्या धम्मचक्र परिवर्तन दिनानिमित्त नशाबंदी मंडळाचे महामानवांचे व्यसनमुक्तीपर विचार पुस्तिकांचे पुनःप्रकाशन समाज कल्याण प्रादेशिक उपायुक्त डॉ. सिद्धार्थ बोधी यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी सिद्धार्थ गौतम बुद्धाने पंचशीलेतील पाचव्या शिलामध्ये 'सुरामेरय मज्जपमादठाणा वेरमणी शिक्खापदमं समादियामि' अर्थात कोणत्याही मद्य पदार्थाचे सेवन न करण्याची शिकवण बुद्धाने दिली होती. हेच काम आपण पुढे नेत असल्याची जाणीव सिद्धार्थ बोधी यांनी करून दिली. प्रचारबुथवर विवेकी पुस्तकांची विक्री व व्यसनमुक्तीची पोस्टर प्रदर्शनी भरविण्यात आली होती.

यावेळी छत्तीसगड तर्कशील परिषदेचे डॉ. आर. के. सुखदेव, प्रा. माधुरी दुपटे गायधनी, बहुजन सौरभ चे कार्यकारी संपादक विलास गजभिये, सत्यजित सूर्यवंशी, विनोद उलीपवार, सुनील गणवीर, संतोषी मेडम, रेखा भगत, डॉ. उमेश जनबंधू, डॉ. केशव मेंढे, डॉ. एम. एस. जांभुळे, संगीता आळणे, अमित सहारे, प्रमोद मून, कल्पना मून, अशोक खोरगडे, सेवकराम राऊत, मनीष अडागळे, विलास शेवाळे, प्रकाश कांबळे सांगोष्टी महिला संघटनेच्या पुष्पा बौद्ध, विद्या चौधरी, मीना मेश्राम इत्यादी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संचालन महाराष्ट्र अंनिसचे जिल्हा कार्याध्यक्ष तथा नशाबंदी मंडळाचे जिल्हा संघटक गौरव आळणे यांनी केले.

# विजयश्री नागरी सहकारी पतसंस्थेची 31 वी वार्षिक सर्वसाधारण सभा

### 686 लाख रुपयांचे कर्जवाटप



**गोंदिया :** विजयश्री नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित गोंदिया हिची 31 वी वार्षिक सर्वसाधारण सभा 28 सप्टेंबर 2025 रोजी स्थानिक क्षत्रिय सेलिब्रेशन हॉल, रामनगर, गोंदिया येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाली. या सभेचा प्रारंभ संस्थेचे अध्यक्ष संजय वि. जयस्वाल आणि उपाध्यक्ष गणेश चिधालोरे यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने झाला.

सभेचे संचालन संस्थेचे संचालक अब्दुल वहाब यांनी केले, त्यानंतर संस्थेचे अध्यक्ष संजय वि. जयस्वाल यांनी संस्थेची प्रस्तावना प्रस्तुत केली. त्यांनी संस्थेच्या वित्तीय प्रगतीचे वर्णन करत सभासदांच्या योगदानाची प्रशंसा केली आणि संस्थेच्या निरंतर प्रगतीसाठी त्यांच्या सहकार्याची आवश्यकता व्यक्त केली. तसेच, आगामी वर्षांमध्ये संस्थेच्या विकासासाठी अधिक सहकार्य मिळेल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

या सभेत संस्थेचे उपाध्यक्ष गणेश चिंधालोरे यांनी संस्थेचा वार्षिक प्रतिवेदन प्रस्तुत केला. त्यामध्ये त्यांनी सांगितले की, या वर्षी संस्थेच्या डिपॉझिटमध्ये 1.3 कोटी रुपयांची वाढ झाली असून, संस्थेने 686.42 लाख रुपयांचे कर्ज सभासदांना वितरित केले. संस्थेचा निधी सतत वाढत आहे, ज्यामुळे संस्थेचे आर्थिक रेकॉर्ड मजबुत झाले आहेत. यावर्षी संस्थेने नवप्रति संत लाभार्थी मित्र नेतृत्व प्रस्ताव आणला आहे. संस्थेचे संचालक राजेंद्र रामटेककर यांनी सहकार क्षेत्रातील कार्यशीलपुंजीच्या 1341.32 लाख रुपयांच्या रकमेची माहिती दिली. मनोज चव्हाण यांनी आयव्यय पत्रक तसेच वाहब यांनी अंदाजपत्रक प्रस्तुत केले. सर्व उपस्थित सभासदांनी यावर अनुमती प्रदान केली. सभेतील प्रमुख उपस्थितींमध्ये संस्थेचे संचालक मोहम्मद शकील शेख, भरत कुमार छत्रिय, वसंत बढे, रुक्मिणी गुप्ता, ज्योती जयस्वाल, बँक प्रतिनिधी कृणा गुप्ता, होमलाल गौतम, शैलेश भाई पटेल तसेच कलाकार समिती सदस्य मुकेश पटेल आणि श्रीकांत जयस्वाल यांचा समावेश होता.

सभा समाप्तीपूर्वी, दिवंगत सचिव स्वर्गीय विश्वनाथ सुखदेवे आणि बँक प्रसिद्धी स्वर्गीय अजय जयस्वाल यांना श्रद्धांजली अर्पित करण्यात आली.

सभेची यशस्वी आयोजन करण्यासाठी संस्थेचे व्यवस्थापक दीपक, ॲड. श्रीवास, भारत भूषण चौरे, रामराज बोरकर, संजय बागडे, प्रेम रतन नायडू, सुखदेव शेंद्रे आणि अविनाश कनोजिया यांनी कठोर परिश्रम घेतले.



## बोधीसत्व नागार्जुन बुद्ध विहारात वर्षावास समाप्ती

**नागपूर :** भारतीय बौद्ध महासभा नागपूर शाखेच्या विद्यमाने वर्षावासानिमित्त देवानंद वानखेडे, केंद्रीय शिक्षक/बौध्दाचार्य यांनी विविध विषयावर मार्गदर्शन केले. बोधीसत्व नागार्जुन बुध्द विहारामध्ये तेथील पदाधिकारी यांनीं कार्यक्रमाचे आयोजन केले होते, त्या कार्यक्रमाचा समारोप झाला. गंगाधर कांबळे सचिव समता सैनिक दल यांनी शुभेच्छा देऊन आपले मनोगत व्यक्त केले, कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सुरेंद्र मून, विहार समितीचे अध्यक्ष होते, दादाराव सहारे यांनी संचालन व आभार प्रदर्शन केले.

PROPERTY FOR SALE




Prime Land with Construction for Sale
Wela (Hari), Shankarpur Road, Nagpur (Gramin)
Perfect for Educational Institutions:
Area 0.46 hectares (50,000 Sq. Ft) with construction around 35000 Sq. Ft., Ideal for Schools, College, Training Center, Residential Tution College, Hotel, Hostel,
Contact : Sulay 9860361121

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648